cmyk

## संपादकीय

### धूर्त अमेरिकेपासून सावधानताच हवी

पंतप्रधान नरेंद्र मोदींची अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याशी चर्चा झाली. अमेरिकेचे वैशिष्ट्य असे आहे की त्यांच्याकडे आलेला पाहुणा त्याच्या देशात परत पोहोचेपर्यंत ते वेगळीच टूम सोडत असतात. पाहुण्याने मायदेशी परत जाऊन आपल्या दौऱ्याची यशोगाथा सांगण्यास सुरुवात करण्यापूर्वीच मिठाचा खडा टाकलेला असतो. त्याचे कारण जागतिक व्यवस्थेत स्वत:ला ते सर्वोच्च स्थानी मानतात. ते सगळ्यांना आपल्या आधीन ठेवण्याचा प्रयत्न करतात.


दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com





बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–२९५ | सोमवार, दि.१७ फेब्रुवारी २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये

# तुरीला ८ हजारांचा भाव द्या

## शेतकऱ्यांची मागणी ; कर्नाटकप्रमाणे ४५० रुपये बोनस देण्याची गरज

**मुंबई । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र सरकारने हमीभावाने २ लाख ९७ हजार टन तूर खरेदीला परवानगी दिली. पण सरकारने कर्नाटकप्रमाणे तुरीसाठी बोनसही जाहीर करावा, अशी मागणी शेतकरी करत आहेत. कर्नाटकने हमीभावार ४५० रुपये बोनस दिला आहे. त्यामुळे कर्नाटकमधील शेतकऱ्यांना हमीभाव ७ हजार ५५० रुपये आणि बोनसचे ४५० रुपये, असा एकूण ८ हजार रुपये भाव मिळणार आहे. महाराष्ट्र सरकारनेही शेतकऱ्यांना ८ हजार रुपये भाव देण्याची मागणी शेतकरी करत आहेत.**

तुरीच्या भावात मागील वर्षभर चांगली तेजी होती. तुरीचा भाव उच्चांकी १२ हजार ५०० रुपयांवर पोचला होता. मात्र त्यानंतर भाव कमी होत गेला. आतातर हमीभावही मिळत नाही. बाजारात सध्या तूर ६ हजारांपासून विकली जात आहे. तर सरासरी भाव ६ हजार ५०० ते ७ हजार रुपयांच्या दरम्यान आला.



मागील वर्षभरात आलेल्या तेजीचा फायदा शेतकऱ्यांना झालाच नाही. उलट नवा माल बाजारात येण्याच्या आधीच भाव कोसळले. तुरीला हमीभावापेक्षा एक हजारांपर्यंत कमी भाव मिळत आहे. सरकारही शेतकऱ्यांची बोळवण केवळ हमीभावावर करत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजी होती. कर्नाटक सरकारने मात्र शेतकऱ्यांच्या भावनेचा विचार करून तुरीला बोनस जाहीर केला. कर्नाटक सरकारने जानेवारीतच हमीभावाने तूर खरेदी जाहीर केली. कर्नाटक देशात तूर उत्पादनात आघाडीवर आहे. कर्नाटकातील काही भागात तुरीची आगाप लागवड होते. त्यामुळे काही बाजारांमध्ये तुरीची आवकही लवकर सुरु होते. पण तुरीला ६ हजारांपासून भाव मिळत असल्याने ◀◀ पान २ वर

# राजीनामा द्यायचा की नाही हे धनंजय मुंडेंनीच ठरवावे

## अजित पवार यांचे मोठे विधान



**नाशिक। प्रतिनिधी**

**माझ्यावर सिंचन घोटाळ्याचे आरोप झाले तेव्हा नैतिक जबाबदारी स्वीकारून मी राजीनामा दिला होता. आता या सगळ्या प्रकरणात राजीनामा द्यायचा की नाही, हे धनंजय मुंडे यांनीच ठरवावे, असे मोठे विधान अजित पवार यांनी केले आहे. पुरावा नसेल म्हणून धनंजय मुंडे यांनी राजीनामा दिला नसेल पण मी आरोप झाल्यावर २०१०–११ वेळी राजीनामा दिला होता. माझ्या सद्सद्विवेक बुद्धीला ते आरोप पटले नव्हते. शेवटी ज्याचा त्याचा निर्णय ज्याने त्याने घ्यायचा असतो, असे विधान अजित पवार यांनी केले.**

अजित पवार हे नाशिकच्या दौऱ्यावर आले असताना बोलत होते. पुढे बोलताना म्हणाले, मी अनेक वर्षांपासून काम करतोय, मी अनेक महत्त्वाची खाती सांभाळली आहेत. मला अनेकदा बदनाम करण्याचा प्रयत्न झाला. माझी जनमानसांतील प्रतिमा खराब करण्याचाही प्रयत्न झाला. सिंचन घोटाळ्यावेळी आरोप झाल्यावर मी राजीनामा दिला हे खरे आहे पण त्यावेळी मला पटले नाही म्हणून मी राजीनामा दिला. पण आताची परिस्थिती वेगळी आहे. आम्ही चौकशी करत आहोत, असेही अजित पवार यावेळी म्हणाले. यावेळी ते म्हणाले की, सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण अतिशय निंदनीय आहे. माणुसकीला काळिमां ◀◀ पान २ वर

# आरोपीला संरक्षण दिले तर देशमुख कुटुंब टोकाचे पाऊल उचलणार

## धनंजय देशमुख यांचा इशारा

**बीड । प्रतिनिधी**

**धस आणि मुंडे यांच्या भेटीने मनात चलबिचल नाही. गाव आहे, लोकप्रतिनिधी आहेत, या लढ्याला त्यांनी स्वत:च्या अंगावर घेतले आहे. या प्रकरणात कुणीही दगाफटका करू नये, एकही आरोपी सुटता कामा नये ही आमची प्रामाणिक अपेक्षा आहे. एखादा आरोपी सुटणार आहे, असे जेव्हा आम्हाला वाटेल त्यावेळी मी आणि माझे कुटुंब टोकाचे पाऊल उचलणार आहोत असा गंभीर आणि**



**निर्वाणीचा इशाराच धनंजय देशमुख यांनी दिला आहे.**

भाजपचे आमदार सुरेश धस यांनी काही दिवसांपूर्वी राष्ट्रवादीचे नेते धनंजय मुंडे यांची भेट घेतली होती. या भेटीमुळे सध्या राजकारण पेटले आहे. विरोधकांकडून सुरेश धस यांच्यावर जोरदार टीका केली जात आहे. धनंजय मुंडे आणि सुरेश धस यांच्या भेटीवर आता मृत सरपंच संतोष देशमुख यांचे भाऊ धनंजय देशमुख यांनी प्रतिक्रिया ◀◀ पान २ वर

# रेल्वे स्थानकावर चेंगराचेंगरी; १५ जणांचा मृत्यू


नवी दिल्ली: दिल्ली रेल्वे स्थानकावर चेंगराचेंगरी होऊन १५ जणांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. या घटनेत १० जण जखमी आहेत. मृत्यूमुखी पडलेल्यामध्ये तीन लहान मुलांचा समावेश असल्याची माहिती समोर आली आहे. ही दुर्दैवी घटना शनिवारी (दि.१५) रात्री १० च्या दरम्यान घडली.

चेंगराचेंगरीच्या घटनेनंतर जखमींना एलएनजेपी रुग्णालयात तातडीने दाखल करण्यात आले. मात्र जखमींमधील १५ जणांचा रुग्णालयात मृत्यू झाला. ज्यामध्ये ११ महिला, दोन पुरूष व २ लहान मुलांचा समावेश आहे. या घटनेनंतर रेल्वे स्थानकाचा हा परिसर बॅरिकेड्स लावून बंद करण्यात आला आहे. ही दुर्दैवी घटना नवी दिल्ली रेल्वे ◀◀ पान २ वर

# कापूस खरेदी सुरू करण्याबाबत केंद्र सरकारशी चर्चा करणार – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**जळगाव । वृत्तसंस्था**

जिल्ह्यातील शेतकऱ्यांची सीसीआयने बंद केलेली कापूस खरेदी पुन्हा सुरू करण्यासाठी केंद्रीय मंत्र्यांशी चर्चा केली जाईल. कोणत्याही परिस्थितीत शेतकऱ्यांचा उत्पादित माल घरातच राहणार नाही, याची काळजी राज्य शासन घेईल. या परिसराचे चित्र बदलण्यासाठी आवश्यक ते सहकार्य राज्य



शासन करेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यास राज्य शासनाचे प्राधान्य आहे. वीज आणि पाणी यासंदर्भात शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्याला शासनाने प्राधान्य दिले आहे. सौर पंपासाठी पैसे भरलेल्या शेतकऱ्यांना पुढच्या १५ दिवसात आणि मागणी नोंदवल्या नंतर प्रत्येक शेतकऱ्याला ◀◀ पान २ वर

# महाकुंभ मेळ्यात आतापर्यंत ५१ कोटींहून अधिक भाविकांचे पवित्र स्नान

**प्रयागराज । वृत्तसंस्था**

**उत्तर प्रदेशातील प्रयागराजमधील त्रिवेणी संगमावर महाकुंभमेळा सुरू आहे. १३ जानेवारीपासून या महाकुंभ मेळ्याला प्रारंभ झाला. तेव्हापासून शनिवार, १५ फेब्रुवारीपर्यंत ५१.४७ कोटींहून अधिक लोकांनी पवित्र स्नान केले, या संदर्भातील माहिती उत्तर प्रदेश सरकारच्या माहिती आणि जनसंपर्क विभागाने दिल्याचे वृत्त वृत्तसंस्थेने दिले आहे.**

उ. प्रदेश सरकारच्या माहिती विभागानुसार, रविवार १६ फेब्रुवारीला दुपारी ४ वाजेपर्यंत १.१८ कोटी भाविकांनी त्रिवेणी संगमानात पवित्र स्थान केल्याचे देखील सांगितले. उत्तर प्रदेशातील प्रयागराजमधील गंगा, यमुना आणि गुप्त ◀◀ पान २ वर

### ४५ दिवसांचा महाकुंभमेळा

उ. प्रदेशातील प्रयागराजमध्ये महाकुंभमेळा दर १२ वर्षांनी होतो. याआधीचा कुंभमेळा २०१३ मध्ये झाला होता. त्यानंतर २०१९ मध्ये अर्धकुंभमेळा झाला. तो दर ६ वर्षांनी होतो. आता तब्बल १२ वर्षानंतर प्रयागराजमध्ये सुरु असलेल्या ४५ दिवसांच्या महाकुंभ मेळ्यास त्रिवेणी संगमावर पवित्र स्नानासाठी लाखो भाविक येत आहेत.

# शेतकऱ्यांच्या प्रश्नांसह तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील–आ.विजयसिंह पंडित

## वडगाव (चिखली) येथे १ कोटी २५ लक्ष रुपयांच्या विकासकामांचा शुभारंभ

**गेवराई । प्रतिनिधी**

**गेवराई विधानसभा मतदारसंघातील विविध विकास कामांचा बॅकलॉग भरुन काढण्यासाठी प्रामाणिक काम करत भैय्यासाहेबांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण भागातील शेती आणि शेतीशी संबंधित असणाऱ्या शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांसह तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी आपण कायम प्रयत्नशील राहणार असल्याचा विश्वास गेवराई मतदारसंघाचे आमदार विजयसिंह पंडित यांनी येथे बोलताना व्यक्त केला.**



गेवराई तालुक्यातील वडगांव (चिखली) येथे गेवराई विधानसभा मतदारसंघाचे आमदार विजयसिंह पंडित यांच्या शुभहस्ते १ कोटी २५ लक्ष रुपयांच्या विविध विकास कामांचा शुक्रवार दि.१४ फेब्रुवारी रोजी भव्य शुभारंभ पार पडला यावेळी ते बोलत होते. यावेळी स्व.माणिकराव काळे पाटील प्रतिष्ठान व ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा भव्य नागरी सत्कार करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर रा.काँ.पार्टीचे तालुकाध्यक्ष भाऊसाहेब नाटकर, जेष्ठ कार्यकर्ते भागवतराव काळे, पं.स.सदस्य परमेश्वर खरात, जयसिंग जाधव, प्रा.मुकुंद काळे, ॲड.सोमेश्वर काळे, राजेंद्र वारंगे, कृ.उ.बा.स संचालक अशोक खरात, सरपंच मच्छिंद्र ढेरे, संपादक अमोल वैद्य, पत्रकार विनोद पौळ, बाळू वारे, तीर्थराज गवारे, ग्रामसेवक राजेंद्र बन, प्रल्हाद यादव, बापूसाहेब हुंबरे, ग्रा.पं. सदस्य अशोक जाधव सह गावातील ◀◀ पान २ वर

# लाडकी बहिण इन्कम टॅक्सच्या रडारवर

## उत्पन्नाच्या माहितीसाठी सरकारचा मोठा निर्णय

**मुंबई । प्रतिनिधी**

**मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना विधानसभा निवडणुकीत महायुती सरकारसाठी गेमचेंजर ठरली होती. मात्र निवडणुकीनंतर ही योजना नियमांच्या कचाट्यात अडकलेली पाहायला मिळत आहे. सरकारने नियमावलीत वाढ करत अर्जदार महिलांची पडताळणी करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच काही अपात्र महिलांची नावे वगळण्याची प्रक्रिया देखील सुरू झाली आहे. यानंतर आता प्राप्तिकर विभागाची मदत घेतली जाणार असल्याची माहिती समोर येत आहे.**

लोकसभा निवडणुकीतील पराभवानंतर महायुती सरकारने राज्यातील महिलांसाठी जुलै २०२४ मध्ये मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना जाहीर केली. आतापर्यंत योजनेचे ७ हप्ते वितरीत करण्यात आले आहेत. राज्यातील २ कोटी ४१ लाखांहून अधिक महिलांना या



योजनेचा लाभ मिळत आहे. मात्र विधानसभा निवडणुकीनंतर अवघ्या २ महिन्यांतच महिला आणि बालविकास विभागाने लाडकी बहीण योजनेतील तब्बल ५ लाख अपात्र बहिणींना वगळले आहे. या निर्णयामुळे राज्य सरकारचे महिन्याला ७५ कोटी रुपये वाचणार आहेत. यानंतर आता लाडकी बहीण योजनेच्या उधळपट्टीला लगाम घालण्यासाठी प्राप्तिकर विभागची मदत घेतली जाणार असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण बहीण ◀◀ पान २ वर

## बाजारभाव



**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१५ फेब्रुवारी २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १२.०० क्विंटल | २,५०० | ३,५०१ | २,९६६ |
| ज्वारी/हायब्रिड: १८.५० क्विंटल | १,९१० | २,९०० | २,२५० |
| मका/लोकल:५.०० क्विंटल | २,२०१ | २,२०१ | २,२०१ |
| तूर : ६४.५० क्विंटल | ७,२०० | ७,५०० | ७,३४९ |
| उडीद : १८.०० क्विंटल | २,६०० | ३,२३६ | २,९२८ |
| बाजरी: ४.०० क्विंटल | २,५०० | २,५९१ | २,५४५ |
| मुग : ०.५० क्विंटल | ६,८०० | ६,८०० | ६,८०० |
| सोयाबीन: ६६.०० क्विंटल | ४,००० | ४,००० | ४,००० |
| हरभरा: १८.०० क्विंटल | ५,५०० | ५,७०१ | ५,६३४ |

# बीडच्या पाणीपुरवठ्याप्रश्नी आ.संदीप क्षीरसागरांकडून पुन्हा अजितदादांची भेट

## उन्हाळ्यापूर्वी सुरळीत पाणीपुरवठा होण्यासाठी आ.क्षीरसागरांचा पाठपुरावा सुरू

**बीड । प्रतिनिधी**

**बीड शहराच्या सुरळीत पाणीपुरवठ्यासाठी आ.संदीप क्षीरसागर गेल्या अनेक दिवसांपासून सातत्याने पाठपुरावा करत आहेत. आताही रविवारी (दि.१६) रोजी जुन्नर येथे आ.संदीप क्षीरसागर यांनी दुसऱ्यांदा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित दादा पवार यांची याच संदर्भात भेट घेतली.**

बीड शहराला पाणी पुरवठा करण्यासाठी अमृत अटल योजना आणि बिंदुसरा धरण आणि माजलगाव बॅकवॉटरमध्ये पाण्याची पुरेशी उपलब्धता आहे. मात्र नगरपालिकेकडे महावितरण कंपनीचे ३६ कोटी रुपयांचे



वीजबिल थकलेले आहे. त्यामुळे अमृत अटल पाणीपुरवठा योजनेसाठी आवश्यक असलेले नवीन वीज कनेक्शन देण्यात येत नसल्याने पाणी उपलब्ध असताना देखील बीड शहराला पाणी मिळत नाही. याबाबत आ.संदीप क्षीरसागर यांनी गेल्या अनेक दिवसांपासून विधीमंडळ अधिवेशनात, शासनाकडे, प्रशासकीय स्तरावर आणि न्यायालयात देखील हा बीडकरांचा मुलभूत प्रश्न मांडला आहे. सुयोगाने कर्तव्यदक्ष नेते ना.अजित दादा पवार यांच्याकडे बीड जिल्ह्याचे पालकमंत्री पद आले असल्यामुळे आ.संदीप क्षीरसागर याविषयी ना.अजितदादांकडे या विषयात न्याय मागत आहेत. आ.क्षीरसागर यांनी याच विषयावर दोन आठवड्यांपूर्वी मुंबई येथे ना.अजितदादांची भेट घेतली होती. आता पुन्हा याच विषयावर आ.क्षीरसागरांनी ना.अजितदादांची रविवारी (दि.१६) रोजी जुन्नर येथे भेट घेतली. यावेळी ना.अजित दादा पवार यांनी विद्युत विभागाचे व्यवस्थापकीय संचालक यांना याविषयी तातडीने मार्ग काढण्यासाठी आदेश दिले आहेत. उन्हाळ्याच्या पूर्वी बीड शहराचा पाणीपुरवठा ना.अजितदादांच्या माध्यमातून सुरळीत होईल आणि गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या बीडकरांच्या मुलभूत सोयीसाठी सुरू असलेल्या पाठपुराव्याला यश येईल असा विश्वास आ.संदीप क्षीरसागर यांनी व्यक्त केला आहे.

cmyk

## अग्रलेख

# धूर्त अमेरिकेपासून सावधानताच हवी

पंतप्रधान नरेंद्र मोदींची अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याशी चर्चा झाली. अमेरिकेचे वैशिष्ट्य असे आहे की त्यांच्याकडे आलेला पाहुणा त्याच्या देशात परत पोहोचेपर्यंत ते वेगळीच टूम सोडत असतात. पाहुण्याने मायदेशी परत जाऊन आपल्या दौऱ्याची यशोगाथा सांगण्यास सुरुवात करण्यापूर्वीच मिठाचा खडा टाकलेला असतो. त्याचे कारण जागतिक व्यवस्थेत स्वत:ला ते सर्वोच्च स्थानी मानतात. ते सगळ्यांना आपल्या आधीन ठेवण्याचा प्रयत्न करतात. विशेष सांगण्यासारखी बाब अशी की मोदी अमेरिकेत असतानाच अमेरिकेच्याच परराष्ट्र मंत्रालयाचे माजी अधिकारी माइक बेंझ यांनी केलेले खळबळजनक खुलासे. एकाच वेळी अमेरिका किती तोंडाने बोलते आणि वागते याचा नमूनाच बेंझ यांच्या दाव्यांमुळे सप्रमाण सिद्ध झाला आहे.

भारत आणि अन्य देशांनी बेंझ महाशयांची प्रशंसाच करायला हवी त्याचे कारण त्यांनी अमेरिकेचा परिचित असूनही उघड न झालेला चेहरा निष्ठूरपणे समोर आणला. अमेरिकेतर देशांच्या राष्ट्रप्रमुखांच्याच नव्हे, तर त्या राष्ट्रांच्या नागरिकांनीही किती सावध राहणे आवश्यक आहे त्याचा वस्तुपाठ बेंझ यांच्या गौप्यस्फोटातून घेणे गरजेचे आहे. मोदी ट्रम्प भेटीत व्यापार आणि अन्य अनेक क्षेत्रांत सहकार्य आदी विषयांवर अपेक्षेनुरूप फलदायी चर्चा झाल्या आहेत. ट्रम्प यांना मोदींचे कथित मित्र मानले जाते व त्यामुळे भारताच्या दृष्टीने भेटीत काय काय होणे अपेक्षित आहे याची एक यादीच माध्यमांतून गेल्या काही दिवसांत झळकली होती. या यादीतील बहुतेक मुद्द्यांना उभय नेत्यांच्या भेटीत स्पर्श झाला आहे. दहशतवाद्यांचा आश्रयदाता पाकिस्तानचाही उल्लेख आला व ट्रम्प यांनी पाकिस्तानला इशाराही दिला. दहशतवादाला पाकिस्तानातून मिळत असलेले पाठबळ आणि त्यावरूनच पाकिस्तानवर केल्या जाणार्या कारवाईचा उल्लेख केला गेला. पाकिस्तानातूनही शुक्रवारी सकाळीच या विषयावर प्रतिक्रिया दिली गेली. दहशतवादाच्या विरोधातील लढ्यात पाकिस्तानने आतापर्यंत केलेल्या त्यागाकडे दुर्लक्ष केले गेल्याची खंत व्यक्त करताना पाकचे पंतप्रधान शाहबाज शरिफ यांनी काश्मीरचे तुणतुणेही वाजवले. मोदी अमेरिकेत असताना आणि भारतात परत आल्यानंतर भारतातील विरोधी पक्ष आणि सरकारविरोधी गट काय बोलतील किंवा काय बोलणारच आहेत हेही अपेक्षितच आहे. या सगळ्यांत जे अनपेक्षित होते ते माइक बेंझ यांचे गौप्यस्फोट. अमेरिकेत यूएसएड नावाची एक संस्था आहे. या संस्थेचा परराष्ट्र विभागात विलय करण्याचा निर्णय ट्रम्प यांनी गेल्याच आठवड्यात घेतला आहे. त्यानंतरच या संस्थेच्या अनेक धक्कादायक बाबी उघड होऊ लागल्या आहेत. वास्तविक आरोग्य आणि शिक्षण या क्षेत्रांसाठी भरीव काम करण्याच्या उद्दिष्टाने यूएसएडची स्थापना झाल्याचे म्हटले जाते. तथापि, अन्य देशांत सत्तांतरे घडवून आणण्याचे ही संस्था माध्यम बनली होती, असा बेंझ यांच्या खुलाशांचा सार आहे. बेंझ यांच्या म्हणण्यानुसार, यूएसएडचा हा चेहरा बांगलादेश आणि भारतात विशेष सक्रिय होता. बांगलादेशात सत्तांतर घडवून आणले गेले. भारतातही २०१९ च्या अगोदर राजकीय खळबळ निर्माण करण्याचा प्रयत्न केला गेला. बांगलादेशातील शेख हसीना यांचे सरकार कमकुवत करण्यासाठी सांस्कृतिक तणावाचा वापर करून सरकारच्या विरोधात पद्धतशीरपणे प्रक्षोभ निर्माण केला गेला व नंतर बांगलादेशात पुढे काय झाले हे जगजाहीर आहे.

भारतातही अन्य अमेरिकी संस्थांच्या मदतीने सरकारविरोधी वातावरण निर्मितीसाठी सातत्याने प्रयत्न केले जात राहिले आहेत. काही आंदोलनांना आर्थिक रसद पुरवणे, काही समज दृढ करणे, भारतातील समाज माध्यमातून जनमतावर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न करणे असे साधारण याचे स्वरूप होते. बेंझ यांच्या म्हणण्यानुसार, भारतातील सरकार आणि सरकारचे नेतृत्व करणारे नरेंद्र मोदी यांच्या पक्षाला फेक न्यूजचा प्रचार करणारे आरोपी घोषित करून या सगळ्यांना सेन्सॉरशीपच्या कक्षेत आणणे कसे औचित्यपूर्ण आहे याची भलावण केली गेली आणि काही आंतरराष्ट्रीय संस्था आणि संघटनांचीही याकामी मदत घेतली गेली. भारतात लोकशाही कशी दुबळी होत चालली आहे यावर सातत्याने भूमिका मांडणाऱ्या आणि याचा प्रचार आणि प्रसार करणाऱ्या एका संस्थेशी यूएसएडचा संबंध आहे.

स्वतंत्र पत्रकारितेचा विकास करण्याचा दावा करणाऱ्या एका संस्थेलाही यूएसएडने ४१०० कोटी रूपये दिले आहेत. याचे काही लाभार्थी भारतातही आहेत आणि काहींना आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी गौरवले गेले आहे. काही वर्षांपूर्वी अमेरिकेचा छुपा आणि काळा चेहरा उघड करणारे अनेक गौप्यस्फोट करणाऱ्या विकिलिक्सनेही हीच धक्कादायक माहिती जाहीर केली. बेंझ यांच्या दाव्यांचे पडसाद हळूहळू उमटतील. तथापि, आता जे काही समोर आले आहे त्याचा अभ्यास केला तर गेल्या काही काळात भारतात ज्या घटना घडल्या, ज्या क्रमाने घडल्या ते अकस्मात घडले नव्हते हे स्पष्ट होते. काही दिवसांतच एखाद्या आंदोलनाला अत्यंत संघटित स्वरूप प्राप्त होऊन सरकार विरोध प्रक्षोभ निर्माण होणे किंवा सरकारच कोसळणे हे अकस्मात नसते तर कोणाच्या तरी सुनियोजित रणनीतीचा परिपाक असतो व स्वार्थासाठी त्यांनी लोकांचा व संस्थांचा वापर केला असतो हे येथे समजून घेण्यासारखे आहे. या वापर केला जाणाऱ्यांमध्ये केवळ राजकीय व्यक्तीच नव्हे तर पत्रकार आणि कार्यकर्त्यांचा समावेश असतो. काही जण अजाणतेपणे या खेळात सहभागी होतात तर काही जाणीवपूर्वक त्याचा घटक होतात. हे एक दुष्टचक्र आहे. त्याची निंदा करावी तेवढी कमी आहे व त्याबाबत अधिक सावध होण्याची गरज आहे.

## जयंती शांततेत साजरी करा नसता कारवाई करणारच–पोलीस अधीक्षक बारवाल



**अंबड । प्रतिनिधी**

**महापुरुषांची जयंती व सण–उत्सवांच्या काळात प्रत्येकाने आपली सामाजिक जबाबदारी सांभाळणे गरजेचे असून, कोणीही विनाकारण वाद घालतांना आढळून आल्यास त्याच्यावर कडक कारवाई करण्यात येईल, असा ईशारा प्रशिक्षणार्थी पोलीस अधिक्षक तथा अंबड ठाण्याचे प्रभारी सिध्दार्थ बारवाल यांनी शांतता कमिटीच्या बैठकीत बोलतानी इसारा दिला.**

आगामी सण–उत्सवांच्या पार्श्वभूमीवर शांतता कमिटीची बैठक अंबड पोलीस ठाण्यात घेण्यात आली होती . त्याप्रसंगी प्रशिक्षणार्थी श्री. सिद्धार्थ बारवाल बोलत होते. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी विशाल खांबे, सहाय्यक पोलीस निरिक्षक अमोल गुरले यांची प्रमख उपस्थिती होती. यावेळी श्री. बारवाले पुढे म्हणाले की, प्रत्येकाने सण–उत्सव साजरा करतांना कुठलाही वाद होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. तसेच सण–उत्सवाच्या काळात योग्य तो बंदोबस्त ठेवण्यासाठी पोलिसांनी पुर्ण तयारी केली आहे. या काळात कोणीही उपद्रव घालतांना आढळून आल्यास कोणीचीही गय केली जाणार नसून, प्रत्येकाने सण–उत्सव साजरे करतांना शांतताभंग होणार नाही याची दक्षता घ्यावी तसेच कायदा सगळ्यासाठी एकच आहे, असे आवाहन श्री. बारवाल यांनी यावेळी केले. या बैठकीला अंबड शहरातील प्रतिष्ठीत नागरीक, तालुक्यातील सरपंच, पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गावचे पोलीस पाटील मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वडवणी शहर भावसार समाज युवा कार्यकारणी जाहीर

## अध्यक्षपदी निखिल सरवदे, कार्याध्यक्ष रंजीत लांडे, उपाध्यक्ष धिरज गार्डी तर सचिव पदी गणेश सदरे यांची निवड

**वडवणी । प्रतिनिधी**

**वडवणी शहर भावसार समाज युवा कार्यकारणी जाहीर करण्यात आली असून यामध्ये, वडवणी शहर भावसार समाज युवा अध्यक्ष म्हणून निखिल प्रवीण सरवदे, कार्याध्यक्ष रंजीत भास्करराव लांडे, उपाध्यक्ष धीरज राजेंद्र गार्डी तर सचिव पदी गणेश अशोकराव सदरे यांची एक मताने निवड करण्यात आली निवडीनंतर त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.**

बीड जिल्हा भावसार समाज अध्यक्ष प्रकाशराव कानगावकर यांच्या सूचनेवरून बीड जिल्ह्यामध्ये भावसार समाज तालुका निहाय युवा कार्यकारणी स्थापन करण्यात येत आहे. त्यानुसार वडवणी भावसार समाजाच्या युवकांची नुकतीच अध्यक्ष महेश सदरे यांच्या अध्यक्षते खाली तर उपाध्यक्ष विक्रम गार्डी ,मंगेश गार्डी भगवान पतंगे,सचिन गार्डी, राधाकिसन लांडे, प्रकाश पतंगे, सुधाकर तेरकर ,राजेंद्र गार्डी यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये हिंगलाज माता मंदिर वडवणी येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीमध्ये वडवणी शहर युवा भावसार कार्यकारिणी अध्यक्ष म्हणून निखिल सरवदे कार्याध्यक्ष रंजीत लांडे,उपाध्यक्ष धिरज गार्डी सचिव म्हणून गणेश सदरे तर कोषाध्यक्ष निखिल दिगंबर पतंगे ,सहसचिव सुरज सुभाष गार्डी ,तर उर्वरित कार्यकारिणी मध्ये वैभव संतोष पतंगे ,अनिकेत भारत सरवदे ,राज आसाराम पतंगे, अजित रमेशराव गार्डी,अभिषेक वेंकट लांडे, आर्यन नितीन गार्डी ,साहिल भगवान पतंगे ,करण भाऊसाहेब गर्जे



,प्रथमेश विठ्ठल गार्डी, संचित सुभाष गार्डी, आदित्य सुधाकर लांडे यांची निवड करण्यात आली. दरम्यान या निवडीनंतर नवनिर्वाचित कार्यकारिणीचा बीड जिल्हा कार्यकारणीच्या वतीने जिल्हाध्यक्ष प्रकाशराव कानगावकर, उपाध्यक्ष गोपाळराव कंकाळ, सचिव अनिल राव सूत्रे, कोषाध्यक्ष कल्याणराव पतंगे, प्रदीपराव भावसार, प्रभाकरराव हजारे,कैलासराव रंगदळ ,मेत्रजकर, दत्ता पाखरे तर वडवणी भावसार समाजाच्या वतीने अध्यक्ष महेश सदरे उपाध्यक्ष विक्रम गार्डी यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देत सत्कार करत पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. या वेळी झालेल्या छोटेखानी कार्यक्रमात बोलताना बीड जिल्हा अध्यक्ष प्रकाशराव कानगावकर यांनी सांगितले की, बीड जिल्ह्यामध्ये भावसार समाजाच्या युवकांना संघटनेच्या माध्यमातून एकत्र करून त्यांच्या समोर असलेल्या अडचणी त्यामध्ये बेरोजगारी, विवाह विषयक समस्या, व्यवसाय, छोट्या छोट्या उद्योगांना शासन,बँकांकडुन व ईतर मागासवर्गीय महामंडळा कडुन कशा प्रकारे अर्थसाहाय्य मिळविता येईल, जेने करुन समाजातील युवक आर्थिक दृष्ट्या सक्षम होईल.या साठी प्रयत्न केले जात आहेत.त्यासाठी समाजातील युवकांनी एकत्र येण्याची गरज आहे.तरी समाजातील युवकांनी एकत्रित येऊन आपला व समाजाचा विकास करावा असे आवाहन त्यांनी यावेळी उपस्थित युवकांना केले. यावेळी वडवणी भावसार समाज युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बदनापुरातील पथदिव्यांचे खांब केवळ शोभेची वस्तू मुख्याधिकारी यांना दिसत नाही का?

जालना । प्रतिनिधी

बदनापूर शहरात ठिकाणीच रस्ता दुभाजकांमध्ये पथदिव्यांसाठी खांब बसविण्यात आलेले आहेत. मात्र, त्यावर दिवे गत अनेक दिवसांपासून बंद असल्याने हे खांब शोभेची वस्तू आहेत.

याबाबत बदनापूर नगरपंचायत चे मुख्याधिकारी डोळ्यांनी दिसत असलं तरी आंधळे सारखे असल्याचे असा कारभार सुरू आहे . याप्रकरणी जिल्हाधिकारी यांनी तत्काळ लक्ष देणे गरजेचे आहे व तसेच अशा बदनापूर नगरपंचायत चे मुख्यअधिकारी विरुद्ध कारवाई करणे गरजेचे आहे असा रोष सामान्य नागरिकाकडून करण्यात येत आहे. तसेच स्थानिक आमदार यांना पण ह्या समस्या दिसत नाही का असे पण बोलल्या जात आहे. बदनापुरातुन गेलेल्या जालना ते छत्रपती संभाजीनगर महामार्गावरच बसस्थानक, जिल्हा परिषद शाळा, तहसिल कार्यालय आहे. या ठिकाणी रस्त्यावरील दुभाजकांमध्ये पथदिवे बसविण्यात आलेले आहे. मात्र, या दिव्यांना विज पुरवठाच जोडण्यात आलेला नाही. त्यामुळे पथदिवे शोभेची वस्तू बनली आहे. कंत्राटदाराने पथदिव्यांचे काम अर्धवट केले आहे. त्यामुळे या दिव्यांचा प्रकाशच अजपर्यंत पडलेला आहे. गावातील जिल्हा परिषद शाळा ते तहसील कार्यालयपर्यंत हे पथदिवे बसवण्यात आलेले आहेत. ते बसविल्यापासून बंद आहेत. राष्ट्रीय महामार्ग विभागाने पथदीव्यांना विज पुरवठा जोडलेला नसल्याने दिवे बंद असल्याचे सांगण्यात येते. मुख्य रस्त्यावरील पथदिवे बंद असल्यामुळे कायम अंधाराचे साम्राज्य निर्माण होत असून, ते सुरु करावेत, अशी अनेकदा मागणीही करण्य करण्यात आलेली आहे. मात्र, त्याकडे लक्ष दिले जात नसल्याने संताप व्यक्त करण्यात येत आहे. आमदार–खासदारांच्या नीधीतून लाखो रुपये खर्च करून करून हे पथदिवे बसविण्यात आलेले असतांना अद्यापही गावातील मुख्य रस्त्यावर अंधाराचे साम्राज्य कायम आहे. त्यामुळे पथदिवे उभा करण्यासाठी खर्च केलेला पैसा पाण्यात गेल्याचे नागरीक स्पष्टपणे बोलत आहेत. त्यामुळे हे दिवे सुरु करण्याकडे राष्ट्रीय महामार्ग विभागाने तात्काळ लक्ष द्यावे, अशी मागणी होत आहे.

# जीवन शिक्षण अस्थिव्यंग निवासी विद्यालयाचे नेत्रदीपक यश..

**बीड । प्रतिनिधी**

गेवराई येथे सुरू असलेल्या दिव्यांग मुला मुलींच्या बीड जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत मुंदडाताई सेवाभावी संस्था साळेगाव संचलित जीवन शिक्षण निवासी अस्थिव्यंग विद्यालय,केज या शाळेनी विविध क्रीडा प्रकाराच्या स्पर्धेत यश संपादन केले आहे. यामध्ये या विद्यालयाच्या पठाण आयान आसिफ याने १०० मीटर व २०० मीटर धावणे स्पर्धेत अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांक मिळवला.तसेच गौरव गालफाडे याने गोळाफेक स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवला व व्हीलचेअर रेस १०० मीटर



धावणे स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळावला तसेच रोहन डोंगरे याने सॉफ्टबॉल फेकणे स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळवला,परसु काळे यानेदेखील व्हिल चेअर रेस स्पर्धेत द्वितीय क्रमांक घेतला,योगेश लोंढे याने १०० मीटर धावणे स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळवला आणि कु. आरती काळे हिने व्हील चेअर रेस स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळवून यश संपादन केले.या सर्व विद्यार्थ्यांचे मुंदडाताई सेवाभावी संस्था साळेगाव या संस्थेचे सचिव हारून भाई इनामदार मुख्याध्यापक श्री.विनायक ठोंबरे सर, मार्गदर्शक श्री दत्तात्रेय हंडीबाग सर,प्रशासकीय अधिकारी ढाकणे सर, यांनी अभिनंदन केले तसेच प्रशिक्षक भीमाशंकर तोंडसे सर, विशेष शिक्षिका श्रीमती कल्पना थोरात मॅडम, अधीक्षक श्री.लक्ष्मण धोंडगे सर ,फिजिओथेरपीस्ट श्री. अक्षय दोडमिसे सर ,सहकारी श्री सुधाकर गिरी,श्री हिरामण गालफाडे, श्री. अंकुश आहेर इत्यादींनी विशेष परिश्रम घेतले.



**नवगण राजुरी : येथील गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात संत सेवालाल महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करताना प्राचार्य केशव भांगे,उपमुख्याध्यापक शिंदे एस.एस,पर्यवेक्षक दगडे. व्ही एन, शेख.एस .वाय .भोसले बी. एस . यांच्यासह सर्व कर्मचारी उपस्थित होते.**

# अंबडमध्ये अनैतिक संबंधातून खुन करुन पळून गेलेला आरोपी तीन तासात पकडला

**अंबड । प्रतिनिधी**

अंबड येथील पोलीस स्टेशन जवळ असलेली शिवाजी यांची सौभाग्य किराणा दुकान समोर पठाण मोहल्ला येथे जुन्या अनैतिक संबंधाच्या संशयावरुन कलीम शेख खाजा शेख राहणार पठाण मोहल्ला अंबड यास आरोपी सरफराज फेरोज शेख व इतर तिघांनी तिक्ष्ण हत्याराने छातीत, हातावर व तोंडावर गंभीर जखमा करुन जिवे ठार मारल्याची फिर्याद मयताचा भाऊ सलीम शेख खाजा शेख याने पोलीस ठाणे अंबड तक्रार दिले वरुन गु.र.नं. ८९/२०२५ कलम १०३ (१),३(५) भा. न्या.सा. गुन्हा दाखल करण्यात आला सदर गुन्हयाचा तपास प्रशिक्षणार्थी पोलीस अधिक्षक सिध्दार्थ बारवाल हे करीत आहेत. सदरील प्रकरणी पोलीस अधीक्षक श्री बारवाल यांना घटनेची माहिती समजतात आरोपीचा शोध घेण्यासंदर्भात पोलिसांना तत्काळ आदेश केले होते त्या अनुषंगाने सदर गुन्हयातील



फरार आरोपी हा जालना येथील संजीवनी हॉस्पिटल जवळ असल्याची माहिती पोलीस अधिक्षक सिध्दार्थ वारवाल यांना मिळाल्याने त्यांनी तात्काळ पोलीस ठाणेच्या गुन्हे शोध पथकाला सुचना देवून तात्काळ आरोपीतांना अटक करणे साठी पथक जालना येथे रवाना केले असता पथकाने आरोपी सरफराज फेरोज शेख यास संजीवनी हॉस्पिटल चे पाठीमागील बाजुस अंधारातुन शिताफीने ताब्यात घेवुन सदर आरोपीला अटक केली असून सदर आरोपीस आज दि१६ फेब्रुवारी रोजी मा. न्यायालय अंबड येथे हजर केले असता मा. न्यायालयात आरोपीला २०/०२/२०२५ रोजी पर्यंत पी.सी. आर. मंजुर केला आहे. खून यासंदर्भात आरोपीने मयत यास वारंवार विनंती करण्यात येत होती पण मयत समजून घेत नसल्याने आरोपीच्या मनामध्ये भयंकर राग आल्यामुळे त्यांनी कायद्याचा कोणताच विचार ना केल्यामुळे अनैतिक संबंधातून मयताचा खून केला असावे असे बोलल्या जात आहे. आरोपीला असे वाटत असेल की समाजामध्ये आपली बदनामी होत आहे म्हणून अशी घटना घडवून आणली असे बोलल्या जात आहे. पण याप्रकरणी पोलिसांना नियमाप्रमाणे कारवाई करणे गरजेचे आहे. सदरची कामगिरी मा. पोलीस अधिक्षक अजयकुमार बन्सल, अप्पर पो. अधिक्षक आयुष नोपानी, उपविभागीय पोलीस अधिकारी विशाल खांबे यांचे मार्गदर्शनाखाली पो. अधिक्षक सिध्दार्थ वारवाल सपोनि गूरले पोउपनि नरोडे पोहेकों विष्णू चव्हाण, दिपक पाटील, पोकों स्वप्निल भिसे, अरूण मुंढे, चालक भानुसे यांनी केली आहे.

## पान १वरून...

### तुरीला ८ हजारांचा

शेतकरी नाराज होते. शेतकऱ्यांची नाराजी लक्षात घेऊन कर्नाटक सरकारने जानेवारीच्या दुसऱ्या आठवड्यातच हमीभावाने खरेदी जाहीर केली. त्यानंतर तुरीला बोनसही जाहीर केला. कर्नाटकने यंदा ३ लाख ६ हजार टन तूर खरेदीचे उद्दीष्ट ठेवले. तसेच या सर्व तुरीला सरकारने ४५० रुपये बोनसही जाहीर केला. म्हणजेच हमीभाव ७ हजार ५५० रुपये आणि त्यावर बोनस ४५० रुपये, असे एकूण ८ हजार रुपयांचा भाव तुरीला कर्नाटक देणार आहे. त्यामुळे कर्नाटकमधील शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले. कर्नाटकनंतर जास्त तुरीचे उत्पादन महाराष्ट्रात होते. मात्र महाराष्ट्र सर्वच बाबतीत कर्नाटकच्या मागे दिसतो. महाराष्ट्राने आता कुठे २ लाख ९७ हजार टन तूर खरेदीचे उद्दीष्ट जाहीर केले. मात्र महाराष्ट्र सरकारने आद्यापही बोनस जाहीर केलेला नाही. खरे तर महाराष्ट्राची मुख्य पीके असलेल्या कापूस आणि सोयाबीनला हमीभावही मिळाला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना तुरीकडून चांगली अपेक्षा आहे. मात्र तुरीचे भाव पडल्यानेही अपेक्षाभंग होत आहे. सरकारने कर्नाटकप्रमाणे बोनस जाहीर केला तर शेतकऱ्यांना किमान ८ हजारांचा भाव तरी मिळेल. त्यामुळे महाराष्ट्र सरकारने तातडीने बोनस जाहीर करावा, अशी मागणी शेतकरी करत आहेत.

-------------

### आरोपीला संरक्षण दिले तर देशमुख

दिली आहे. देशमुख म्हणाले, आम्हा देशमुख कुटुंबीयांना न्याय हवा आहे. त्यासाठी सर्व घटकांची आम्हाला खूप गरज आहे. मनोज जरांगे आले नसते तर हा खून आठ ते दहा दिवसात त्यांनी पचवला असता असे धनंजय देखमुख म्हणाले. मनोज जरांगे यांनी धस यांच्यावर टीका केली. त्यावरही धनंजय देशमुख यांनी भाष्य केले. यामध्ये मनोज जरांगेची भावना मोठी आहे. या प्रकरणातील एकही आरोपी सुटू नये म्हणून त्यांनी त्यांच्या भावना व्यक्त केल्या. यात काहीही चूक नाही. समाजात अशी दुसरी घटना होऊ नये म्हणून ते बोलतात. यात त्यांचे एकही वाक्य चुकीच नाही, असे धनंजय देशमुख म्हणाले.

--------------

### राजीनामा द्यायचा की नाही हे

फासणारी घटना आहे. त्यामुळे त्यात जे कोणी दोषी असतील त्यांना शासन केले जाईल. कुणालाही सोडले जाणार नाही. मुख्यमंत्र्यांनी त्वरित एसआयटी, सीआयडी नेमली आहे. न्यायालयीन चौकशी देखील सुरू आहे, असे अजित पवार म्हणाले.

---------------

### महाकुंभ मेळ्यात आतापर्यंत ५१

सरस्वती अशा पवित्र नद्यांच्या त्रिवेणी संगमावर महाकुंभमेळा सुरू आहे. १४४ वर्षांनी विशेष असलेल्या या महाकुंभमेळ्याला देश–विदेशातीलअनेक भाविक संगमस्नानासाठी व कल्पवासासाठी प्रयागराजमध्ये दाखल होत आहेत.

----------

### कापूस खरेदी सुरू करण्याबाबत केंद्र सरकारशी

दोन महिन्याच्या आत जोडणी देण्यात येईल. शेतकऱ्यांना २०२६ पर्यंत दिवसाची वीज देण्यासाठी सौर फिडरचे काम वेगाने सुरू आहे. शेतकऱ्याचा माल कोणत्याही परिस्थितीत पडू दिला जाणार नाही, त्याची खरेदी करण्यात येईल. या भागाचे चित्र बदलण्यासाठी आवश्यक सर्व सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, चक्रधर स्वामींचे वास्तव्य लाभलेली ही भूमी आहे. या ऐतिहासिक संस्थेत येण्याची संधी मिळाली. स्वातंत्र्य लढ्याच्या पार्श्वभूमीवर ही शिक्षण संस्था स्थापन झाली. गावातल्या मुलामुलींना उत्तम शिक्षण मिळावे यासाठी गजानन राव गरुड यांनी या संस्थेची स्थापना केली. शिक्षण संस्थेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी अनेक सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. संस्थेच्या समस्या सोडविण्याच्या प्रयत्न करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. या संस्थेच्या माध्यमातून अनेक विद्यार्थी नावारूपाला आले. स्वतः बापूसाहेब गरुड यांचे अनेक भाषांवर प्रभुत्व होते, विविध विषयांचा व्यासंग होता. या चतुरस्त्र व्यक्तिमत्त्वामुळे ते प्रसिद्ध झाले. सरपंच ते विधानसभा उपाध्यक्ष अशा अनेक भूमिकांना त्यांनी न्याय दिला. आज त्यांचे कार्य संस्था पुढे नेत आहे. नुकतीच पायाभरणी केलेली ही अतिशय सुंदर आणि पर्यावरण पूरक इमारत असल्याने विद्यार्थ्यांना त्याचा फायदा होणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

-------------

### लाडकी बहिण इन्कम

योजनेअंतर्गत दरमहा ३ हजार ८८५ कोटी रुपये सरकारी तिजोरीतून द्यावे लागतात. यामध्ये अशा काही महिला लाभार्थी आहेत, त्यांना इतरही योजनांचा लाभ मिळत आहे. परिणामी आता संजय गांधी निराधार योजना, नमो शक्ती योजना व स्वतःहून लाडकी बहीण योजनेचा लाभ नाकारणाऱ्या लाभार्थीची संख्या ५ लाख ४० हजारांपर्यंत पोहोचली आहे. सध्या ज्या लाभार्थी महिलांच्या नावे चारचाकी आहेत, त्याची पडताळणी देखील सुरू आहे. तसेच ज्या कुटुंबांचे उत्पन्न अडीच लाखांपेक्षा अधिक आहे, अशा कुटुंबातील लाभार्थी महिलांना या योजनेतून वगळण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे, अशी माहिती समोर येत आहे.

------------

### शेतकऱ्यांच्या प्रश्नांसह तालुक्याच्या सर्वांगीण

प्रतिष्ठित नागरिक व ग्रामस्थ उपस्थित होते. पुढे बोलताना आ.पंडित म्हणाले की, मतदारसंघातील अनेक गावांत विविध कामे प्रलंबित आहेत. ती विकास कामे आपल्याला मार्गी लावायची आहेत. राज्यात आपलं सरकार आहे. पाच वर्ष हे सरकार आपलं सरकार आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते अजितदादा पवार हे आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे आहेत. त्यामुळे पाच वर्षात जास्तीत जास्त निधी तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी आणून भैय्यासाहेबांच्या मार्गदर्शनाखाली आपल्याला विविध कामे करायची आहेत. शिवछत्र परिवाराबरोबर मायबाप मतदार आणि तरुण कार्यकर्त्यांनी माझ्यावर विश्वास दाखवला मला साथ दिली. मतदारांच्या खूप अपेक्षा आहेत. सर्वांच्या अपेक्षा नक्कीच पुर्ण करण्यासाठी आपण प्रयत्नशील असणार आहेत. आपण दिलेले प्रेम हे विसरुन चालणार नाही. हे जे काही ऋण आहे याच्यातनं कधीच उतराई होणार नाही. कारण दहा वर्षापासून शिवछत्र परिवार संघर्ष करतोय आपण ते उद्दिष्ट साध्य केलं ते तुम्ही करुन दाखवलं त्याच्यामुळे याची जाणीव निश्चितपणाने संपूर्ण परिवाराला आहे. तसेच आता जिल्हा परिषद, पंचायत समिती, आणि नगरपालिकेच्या निवडणूका होतील यातही शिवछत्र परिवार आपल्या सर्वांच्या सहकार्याने वर्चस्व प्रस्थापित करेल असा विश्वास व्यक्त करुन कार्यकत्यांनी यासाठी कामाला लागावे असे आवाहनही शेवटी बोलताना व्यक्त केले. यावेळी परमेश्वर खरात, भाऊसाहेब नाटकर, मुकुंद काळे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी सुभाष औटे, गुलाब औटे, परमेश्वर काळे, माजी सरपंच बबनराव ओटे, नारायण यादव, राजाभाऊ काळे, सुरेश काळे, नकुल औटे, हताम्रध्वज औटे, जिमुरध्वज औटे, श्रीनिवास काळे, महारुद्र काळे, भाऊसाहेब काळे, अशोक काळे, अभिषेक काळे, भारत काळे, महेश औटे, साईनाथ सुरवसे, विष्णू ठोसर, अशोक जाधव, गहणीनाथ शिंदे, अंगद सुपेकर, शिरु वारे, अशोक औटे, बाबूभाई सय्यद, राघू भोसले, प्रल्हाद राऊत, कल्याण धोत्रे, केशव कदम, अण्णासाहेब सुरवसे, देविदास जाधव, अमोल पवार, अमोल पानखडे, अंगद जाधव , रामनाथ यादव, शिवाजी काळे, कालिदास औटे सह चिखली , सुशी, साठेवाडी, कवडगाव येथील ग्रामस्थांसह आदी उपस्थित होते. यशस्वीतेसाठी स्व.माणिकराव काळे पाटील प्रतिष्ठानचे संस्थापक तथा ग्रा.पं.सदस्य वशिष्ट काळे पाटील, बबन काळे, बाळू भोसले, बाबू औटे, सुनील काळे, सतीश काळे, मंगेश काळे, अमर काळे, प्रशांत काळे, भारत काळे, संदीप काळे, दत्ता सुरवसे सह कार्यक्रमाचे प्रास्ताविक वशिष्ट काळे पाटील यांनी तर सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन मयुरध्वज औटे यांनी व्यक्त केले.

---------------

### रेल्वे स्थानकावर चेंगराचेंगरी; १५

स्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्रमांक १४ आणि १५ वर घडली. रात्री १० च्या सुमारास या घटनेची माहिती मिळल्यानंतर रेल्वे प्रशासन, सुरक्षा कर्मचारी व चार अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. दिल्लीतून महाकुंभ साठी प्रयागराजला जाण्यासाठी लोकांनी रेल्वे स्थानकावर मोठी गर्दी केली होती. यादरम्यान दोन रेल्वे गाड्या रद्द झाल्याचे सांगण्यात आले. त्यानंतर महाकुंभसाठी विशेष रेल्वे येत असल्याची घोषणा झाल्याने ही दुर्घटना घडल्याचे सांगण्यात येत आहे.

-----------

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

सोमवार, दि. १७ फेब्रुवारी २०२५



## छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे लवकरच शिवरायांचा अश्वारूढ पुतळा आ. धस यांच्या मार्गदर्शनाखाली बसवण्यात येणार –राजू जाधव

पाटोदा । प्रतिनिधी

जे जनतेच्या मनात तेच आमदार सुरेश आण्णा धस यांच्या मनात तमाम पाटोदेकरांच्या मनातील आमदार सुरेश आण्णा धस यांच्यामुळे लवकरच स्वप्न साकार होणार. अखंड हिंदुस्थानची अस्मिता असणारे, जात-धर्म-पंथ यापलीकडे जाऊन सर्वांना आपला वाटणारा राजा म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज यांचा पाटोदा शहरात छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे लवकरच शिवरायांचा भव्य असा अश्वारूढ पुतळा आमदार सुरेश आण्णा धस यांच्या मार्गदर्शनाखाली उभारण्यात येणार आहे आसे नगराध्यक्ष राजू भैय्या जाधव यांनी प्रसिद्धी पत्रकारद्वारे सांगितले आज शनिवार दिनांक १५ फेब्रुवारी रोजी मुंबई येथील प्रसिद्ध मूर्तिकार श्री. देवरे यांच्या कलाकृती मधून () नमुना स्वरूपात पुतळ्याची पाहणी करताना नगराध्यक्ष राजू भैय्या जाधव व महाराष्ट्र राज्यातील प्रसिद्ध मूर्तिकार श्री. देवरे.



# जीबीएस व अन्य साथरोगाचा प्रादुर्भाव होऊ नये या करिता पाण्याचे निर्जंतुकीकरण करुनच पुरवठा करावा –आदित्य जीवने

### पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाकडून सर्व तालुका आरोग्य अधिकारी,पंचायत समिती, ग्रामपंचायतीना सूचना

**बीड । प्रतिनिधी**

राज्यातील गुइलेन बॅरे सिंड्रोम (जी.बी.एस ) विषाणूंचा तसेच अन्य साथीच्या रोगांचा प्रादुर्भाव थांबवण्याकरिता पिण्याच्या पाण्याचे निर्जंतुकीकरण हे ग्रामपंचायत स्तरावर होणे आवश्यक आहे. त्या करिता पिण्याच्या पाण्याचे सर्व स्त्रोत, वितरण व्यवस्था, शाळा ,अंगणवाडी, घरे यांना नळाद्वारे मिळणाऱ्या पाणी नमुन्यांची गावातील प्रशिक्षित महिला स्वयंसेवका मार्फत प्रत्येक महिन्यातून एकदा जैविक व रासायनिक परीक्षण क्षेत्रीय तपासणी संचाद्वारे करावी आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांनी केले.

राज्यातील इतर जिल्ह्यात जीबीएस विषाणूचा प्रादुर्भाव लक्षात घेता शुद्ध पाणीपुरवठा होण्याच्या अनुषंगाने गाव पातळीवर नळ पाणीपुरवठा योजनांचे सर्व स्रोत शाळा, अंगणवाडी व नळाद्वारे घरामध्ये उपलब्ध होणारे पाणी यांच्या जैविक तपासणीसाठी आवश्यक पाणी नमुने अभियान स्वरूपामध्ये गोळा करून नजीकच्या भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेच्या प्रयोगशाळेमध्ये जमा करावे. सीबीएसचा व अन्य साथरोगचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रयोगशाळेत जैविक तपासणी करणे अत्यंत आवश्यक आहे. अशा सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिल्या आहेत

ग्रामीण भागात कुटुंबाला कार्यात्मक घरगुती नळ जोडणीद्वारे पुरेशा प्रमाणात किमान ५५ लिटर प्रतिदिन प्रतिव्यक्ती विहित गुणवत्तेचे पाणी पुरवठा करणे आवश्यक आहे. जल जीवन मिशन अंतर्गत ग्रामीण भागातील जनतेला घरगुती व सार्वजनिक स्रोत, ग्रामपंचायत कार्यालय, शाळा, अंगणवाडी केंद्र, आरोग्य केंद्र ,उपकेंद्र इत्यादी सातत्यापूर्वक गुणवत्तापूर्वक शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे हे मुख्य उद्दिष्ट आहे त्या प्रमाणे ग्रामीण जनतेला गुणवत्तापूर्ण पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी राज्यात पाणी गुणवत्ता सनियंत्रण व सर्वेक्षण कार्यक्रम ग्रामीण भागात गावागावात राबविण्यात येत आहे. याद्वारे गावातील सर्व पिण्याच्या पाण्याच्या श्रोतांची व घरगुती नळ जोडणी द्वारे पुरवठा करण्यात येणाऱ्या शेवटच्या घराच्या नळाच्या पाण्याचे किमान दोन नमुने रासायनिक तपासणी वर्षातून एकदा व जैविक तपासणी वर्षातून दोनदा प्रयोगशाळेत जमा करण्यात यावे असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉक्टर उल्हास गंडाळ यांनी केले आहे.

सीबीएस व अन्य साथ रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी जिल्हा परिषदेचे पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शिक्षण विभाग, आरोग्य विभाग, ग्राम पंचायत विभाग यांच्या समन्वयाने विविध उपक्रम घेण्या बाबत पंचायत समिती व ग्रामपंचायतीना आवश्यक ती कारवाई करण्याबाबत पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे प्रकल्प संचालक तथा उपमुख्य कार्यकारी राजेंद्र मोराळे यांनी सूचना दिल्या आहेत.

## संचेती हॉस्पिटलचा आरोग्याचा जागर,पाटोद्यात होणार मोफत तपासणी

### शिवजयंती निमित्त अस्थिरोग निदान व उपचार रुग्णांनी लाभ घ्यावा डॉ. राजपुरे

पाटोदा (प्रतिनिधी)

पाटोदा शहरात यंदाची शिवजयंती संचेती हॉस्पिटलच्या माध्यमातून दि.१७ फेब्रुवारी सोमवार रोजी सकाळी ८ ते २ यावेळी मोफत अस्थिरोगाचे निदान व उपचार करून आरोग्याचा जागर करीत साजरी होणार आहे. अस्थिरोगाने त्रस्त रुग्णांनी या मोफत शिबाराचा लाभ घ्यावा डॉ. राजेंद्र राजपुरे यांचे आवाहन

भारतातील नामांकित संचेती इन्स्टिट्यूट फॉर ऑर्थोपेडिक्स अँड रिहाबिलीटेशन पुणे यांच्या वतीने दरमहा पाटोदा येथील राजपुरे हॉस्पिटल मध्ये कॅम्प घेण्यात येतो यामध्ये अस्थिरोगाने पिडीत रुग्ण पाटोदा शहरातच संचेती हॉस्पिटलच्या तज्ञ डॉक्टरांच्या निगराणी खाली उपचार घेत असल्याने या कॅम्पला भरभरून प्रतिसाद मिळत असतो यंदाच्या शिवजयंती निमित्त हे तज्ञ डॉक्टर रुग्णांना मोफत सेवा देणारा असून यामध्ये प्रामुख्याने सांधेदुखी,संधीवात,सांधेप्रत्यारोपण, कंबर दुखणे,हाता-पायांना मुंग्या येणे,फ्रोजन शोल्डर,मणक्यांचे जुने आजार,डायबेटिक न्यूरोपॅथी,सायटिका पेन,टेनिस



एल्बो मेंदूचे आजार,हिप व नील रिप्लेसमेंट नंतरचे उपचार करण्यात येणार आहे. तरी या शिबिराचे सर्व पाटोदा व परिसरातील नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन डॉ.राजपुरे यांनी केले असुन गरजु लोकांनी लवकरात लवकर नोंदणी करावी असे आवाहनही करण्यात आले आहे.

## जय भवानी महाविद्यालयात १९९६ च्या बॅचचे स्नेहमिलन

गेवराई । प्रतिनिधी

गढी येथील जय भवानी महाविद्यालयात १९९६ मध्ये दहावी परिक्षा उत्तीर्ण झालेल्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा पार पडला. हे विद्यार्थी तब्बल २८ वर्षानंतर एकत्र आले होते. यानिमित्त आयोजीत कार्यक्रमात गुरुजनांचा सत्कार करत आठवणींना उजाळा देण्यात आला

जयभवानी महाविद्यालयात आयोजीत या कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी प्राचार्य वसंत राठोड हे होते. यावेळी माजी प्राचार्य श्रीमती नागणे , शेख सर, के.पी.ढाकणे, खामकर, दराडे, जरांगे, राठोड , बारगजे, बोर्डे, ढेरे, नाटकर, काकडे, श्रीमती लोमटे, श्रीमती दाभाडे, श्रीमती मुंढे तसेच बंडू बारगजे हे देखील



उपस्थित होते. दिपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. माजी विद्यार्थ्यांच्या वतीने सर्व गुरुजनांचा सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित माजी विद्यार्थ्यांनी शाळेने दिलेल्या शिदोरीवरच आमचे मार्गक्रमण सुरु असून शिक्षकांनी दिलेले धडे आयुष्यात पदोपदी उपयोगी पडत असल्याचे सांगितले. सुत्रसंचलन मनिषा आव्हाड यांनी केले. माजी विद्यार्थ्यांकडून शाळेसाठी कपाट देखील भेट देण्यात आले.

माजी विद्यार्थ्यांचा हा मेळावा यशस्वी करण्यासाठी मेघा नागरगोजे, आम्रपाली निसर्गंध, रोहिणी कुलकर्णी, नवल कुमार ढाकणे, दीपक दुधाळ, दीपक बोर्डे, सचिन ढेरे, विष्णू घोंगडे , आशा अलगुडे, ज्योती शिंदे तसेच पुष्पा नागरगोजे यांनी सहकार्य केले. स्नेहभोजनानंतर वंदे मारतम्? गीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# पिंपळा धायगुडा येथे फार्मसी महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना शिबीर

अंबाजोगाई । प्रतिनिधी

श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित बी फार्मसी महाविद्यालयाचे अंबाजोगाई तालुक्यातील पिंपळा धायगुडा येथे राष्ट्रीय सेवा योजना शिबिर दि ९ ते १५ फेब्रुवारी दरम्यान संपन्न झाले. या साप्ताहिक सेवा योजना शीबिरात विद्यार्थ्यांना सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग घेण्याची प्रेरणा मिळाल्याची भावना निर्माण झाल्याचे पहावयास मिळाले.

९ ते १५ फेब्रुवारी २०२५ दरम्यान धायगुडा पिंपळा या गावात हे शिबिर आयोजित करण्यात आले. या शिबिरात ग्रामस्वच्छता, समाजप्रबोधन, आरोग्य तपासणी आणि सांस्कृतिक कार्यक्रमांसह विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात पिंपळा गावकऱ्यांनी देखील मोठा उत्स्फूर्त असा सहभाग नोंदवला. गावकऱ्यांच्या सकारात्मक प्रतिसादामुळे महाविद्यालयाचे शिबिर यशस्वी झाले. शिबिराच्या समारोप प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संतोष तरके यांनी अशा या शिबिरांमुळे विद्यार्थ्यांना सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण होऊन विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासात वाढ होण्यास मदत होत असल्याची भावना व्यक्त केली. राष्ट्रीय सेवा




योजना () स्वच्छता अभियान हा भारतीय विद्यार्थ्यांसाठी स्वच्छतेच्या महत्त्वाबद्दल जागरूकता निर्माण करण्याचा एक महत्त्वपूर्ण उपक्रम आहे असेही मत प्राचार्य तरके यांनी मांडले. हे अभियान विशेषतः स्वच्छ भारत मिशन ( ) च्या उद्देशाला सहाय्यक ठरते. अंतर्गत स्वच्छता अभियानाची अंमलबजावणी केली जाते ज्यामध्ये विद्यार्थ्यांना सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता राखण्यासाठी प्रेरित व प्रोत्साहित केले जाते.

ह्या कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमुख एम. ए. कुरेशीयांनी विद्यार्थ्यांना स्वच्छतेच्या महत्त्वाची जाणीव करून दिली. तसेच त्यानी विद्यार्थ्यांच्या मदतीने धायगुडा पिंपळा या गावातील सार्वजनिक ठिकाणे, शाळा, महाविद्यालय आणि इतर सार्वजनिक क्षेत्र स्वच्छ केली. पर्यावरणीय साफसफाई आणि कचरा व्यवस्थापनासाठी प्रभावी उपाय तयार करण्यासाठी लोकांना प्रेरित केले. तसेच स्वच्छते संबंधी असणाऱ्या नियमांची ओळख व माहिती गावकऱ्यांना करवून दिली. त्याचबरोबर त्यावर कार्यवाही करत सामाजिक जबाबदारी आणि राष्ट्रीय विकासात सहभागी होण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये एकता निर्माण केली. या साप्ताहिक राष्ट्रीय सेवा योजना शिबिरात विद्यार्थ्यांनी धायगुडा पिंपळा या गावातील ''जीवन आधार वृद्धाश्रम'' या ठिकाणी देखील भेट दिली. यावेळी विद्यार्थांनी वृद्धाश्रमातील वृद्धांचा विरंगुळा व मनोरंजन होण्यासाठी भक्ती गीते सादर केली. सोबतच परिसारतीची स्वच्छता केली. वृद्धापकाळातील निराधार व्यक्तींसाठी असलेला हा आश्रम आश्रयस्थान असल्याचे येथील वृद्धांनी सांगितले. या दरम्यान त्यांना औषधांची माहिती दिली.हे राष्ट्रीय सेवा योजना शिबिर संपन्न करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख एम.ए.कुरेशी यांनीं पुढाकार घेतला व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संतोष तरके तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्यासह विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर सहभागी झाले होते.

## आष्टी येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंतीच्या शुभमुहूर्तावर स्वराज ट्रॅक्टर शोरूमचा उद्घाटन समारंभ

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

शेतकऱ्यांसाठी दणगट व कमी खर्चात ज्यादा काम करणाऱ्या स्वराज्य ट्रॅक्टर खरेदीवर बंम्फर ऑफर आहे.आष्टीकरांच्या लवकरच सेवेत सावळेश्वर उद्योग समूहाचे मा.रमेश दादा आजबे पाटील यांचे सावळेश्वर ट्रॅक्टरच्या शोरूमचा बुधवार दि १९ फेब्रुवारी रोजी आष्टीत छत्रपती शिवाजी महाराज जयंतीच्या शुभमुहूर्तावर स्वराज ट्रॅक्टर शोरूमचा उद्घाटन समारंभ होणार असून तात्काळ बुकिंग करणाऱ्या ग्राहकांसाठी बंपर ऑफर सवलती देण्यात येत असून ग्राहकांना आकर्षक व्याजदर,आकर्षक किंमत व आकर्षक ऑफर मिळणार असून खास ऑफर मिळवण्यासाठी




**शेतकऱ्यांसाठी खुशखबर आष्टीकरांच्या सेवेत प्रथमच स्वराज ट्रॅक्टरचे अधिकृत डिलर सावळेश्वर ट्रॅक्टर्स**

**ग्राहकांना आकर्षक व्याजदर,आकर्षक किंमत व आकर्षक ऑफर मिळणार, तात्काळ बुकींग केल्यास बंम्फर ऑफरची सुवर्णसंधी**

तात्काळ सावळेश्वर ट्रॅक्टर शोरूमला अवश्य भेट द्या आणि ट्रॅक्टर बुकींग करुन सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा. ठिकाण धोंडे पेट्रोल पंपासमोर आष्टी सावळेश्वर उद्योग समूहाचे आपल्या आष्टी शहरांमध्ये स्वराज ट्रॅक्टरचे अधिकृत डीलर सावळेश्वर ट्रॅक्टर्स भव्य शोरूम आपल्या सेवेत घेऊन आले आहे.लवकरच १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंतीच्या शुभमुहूर्तावर या भव्य शोरूमचे उद्घाटन संपन्न होणार असून ट्रॅक्टर घेणाऱ्या ग्राहकांसाठी शोरूमकडून भव्य बंम्फर ऑफर ठेवण्यात आली आहे.सुरुवातीला बुकिंग करणाऱ्या ग्राहकांना प्राधान्य देण्यात येणार असून यासाठी आकर्षक किंमत, आकर्षक व्याजदर आणि आकर्षक ऑफर असणार आहे. ट्रॅक्टर घेण्यासाठी इच्छुक असाल तर सावळेश्वर ट्रॅक्टर्स आष्टी येथील धोंडे पेट्रोल पंपा समोर अवश्य भेट देऊन आजच आपला शेतकऱ्यांचा साथीदार असलेला स्वराज ट्रॅक्टर बुकिंग करून सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा. संपर्क प्रो.प्रा.रमेश ( दादा )आजबे पाटील मो.८०५५९९८०५५, ९९२११ ३४१४३ यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

------

## शिवजन्मोत्सव सोहळ्यानिमित्त बजरंग बली प्रतिष्ठान द्वारा चित्रकला स्पर्धा संपन्न



**बीड । प्रतिनिधी**

अखंड महाराष्ट्राचे दैवत असणारे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त बजरंग बली प्रतिष्ठान द्वारा शालेय विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती ही स्पर्धा दिनांक १५ फेब्रुवारी २०२५ रोजी संपन्न झाली. चित्रकला स्पर्धा तिप्पटवाडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मुर्शदपुर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, लिंबा रुई जिल्हा परिषद प्राथमिक शाळा या शाळेतील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभागी झाले होते. अतिशय आनंदामध्ये ही चित्रकला स्पर्धा संपन्न झाली. कोणत्याही स्पर्धेमध्ये विद्यार्थी आवडीने सहभाग घेतात. यावेळी या स्पर्धेमध्ये चित्रकलेचे विषय होते छत्रपती शिवाजी महाराज, राजमाता जिजाऊ, शिवसृष्टी, गड किल्ले प्रतापगड, रायगड, सिंधुदुर्ग या किल्ला पैकीच एक किल्ल्याचे चित्र काढायचे होते. अतिशय छान असे या मुलांनी चित्र काढले.

पान ६ वरून...

### संत सेवालाल महाराज

संदीप (भैय्या) क्षीरसागर , गेवराई तालुक्याचे कर्तव्यदक्ष नेतृत्व, माजी आमदार अमरसिंह पंडित , भाजपा जिल्हाध्यक्ष आदरणीय शंकर देशमुख , बीड शहरातील अभ्यासू नेतृत्व आदरणीय डॉ. योगेश (भैय्या) क्षीरसागर या प्रमुख मान्यवरांनी संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेला हार घालून पुष्प अर्पण करून अभिवादन केले. सर्व मान्यवरांनी रक्तदान शिबीर युनिटला भेट दिली.आदरणीय मान्यवरांचे जयंती उत्सव समितीच्या वतीने मोठा हार, शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. माजी आमदार सय्यद सलीम सलीम, अल्पसंख्याक समाजाचे नेते सलीम जहांगीर , माजी सभापती नवनाथ शिराळे, दूध संघाचे चेअरमन विलास बापू बडगे, शांतिनाथ डोरले, डॉ. देविदास नागरगोजे, प्रकाश ठाकूर, भीमशक्तीचे डॉ.अर्मेंद्र विद्यागर तसेच बंजारा समाज बांधव व वेगवेगळ्या क्षेत्रातील पदाधिकारी बांधवांनी संत सेवालाल महाराज चौकातील येऊन संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पअर्पण करून अभिवादन केले. सर्व समाजातील सामाजिक, शैक्षणिक सांस्कृतिक, राजकीय क्षेत्रातील सर्व प्रतिष्ठित व्यक्तीमत्त्व, समाजसेवक, युवा कार्यकर्ते तरुण बांधव, सेवानिवृत्त अधिकारी,कर्मचारी, मोठ्या संख्येने उपस्थित होते. बीड शहरात सायंकाळी ४ वाजता बंजारा समाजातील सर्व महिला भगिनी यांनी संत सेवालाल महाराज चौकात येऊन संत सेवालाल महाराज यांना पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यानंतर सायंकाळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन नगर रोड, बीड. या ठिकाणी राज्यस्तरीय कवी संमेलन घेण्यात आले. यामध्ये राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त कवी प्राचार्य अरुण पवार परळी, डॉ. वीरा राठोड चाळीसगाव, शंकर राठोड नांदेड, सुरेश राठोड नागपूर,यांनी सर्वांचे मन जिंकून घेतले. कवी संमेलनासाठी बीड शहर व इतर तालुक्यातून समाजाचे बांधव मोठ्या प्रमाणात आले होते. कवी संमेलनासाठी महिला भगिनी व समाज बांधव मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.कवी संमेलनासाठी माजी मंत्री, आदरणीय जयदत्त (अण्णा )क्षीरसागर यांनी कार्यक्रम स्थळी भेट देऊन संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण केले. व उपस्थित समाजबांधवाला संत सेवालाल महाराज यांचे विचार आणि कार्य सांगून शुभेच्छा दिल्या. यावेळी बीड शहरातील सर्व सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, राजकीय क्षेत्रातील समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहून कवी संमेलनास प्रतिसाद दिला. हास्य कवि सम्मेलन असल्यामुळे दिवस कसा गेला ते कळाले नाही. कवी संमेलन संपल्यानंतर सर्व समाज बांधवांनी प्रसादाचा आस्वाद घेतला. संत सेवालाल महाराज यांची २८६ जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम रक्तदान शिबिर व कवी संमेलन अतिशय चांगल्या व नियोजनबद्ध पार पाडण्यासाठी बीड शहर जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष भूषण पवार, कार्याध्यक्ष अंकुश राठोड, उपाध्यक्ष परमेश्वर जाधव, सचिन पवार कोषाध्यक्ष, नितीन चव्हाण प्रसिद्धीप्रमुख , विलास राठोड, विठ्ठल पवार, उत्तम राठोड सर, बिबीषन राठोड सर यांनी अथक परिश्रम घेतले. राज्यस्तरीय कवी संमेलन कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रा. जगन्नाथ चव्हाण सर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अर्जुन चव्हाण, आभार प्रदर्शन परमेश्वर जाधव यांनी केले.

### शिरूर तालुक्यातून जाणाऱ्या

अधिकाऱ्यांनी तात्काळ दखल घेऊन हे रोवलेले पूल काढून ही सर्व लाईन मागे हटवण्याचे काम तातडीने करण्यात आले असून शिरूर कासार पंचायत समितीचे उपसभापती जालिंदर सानप यांच्यामुळे हे पोल तात्काळ मागे घेण्याचे काम सुरू झाल्यामुळे अनेक गावच्या नागरिकांमध्ये त्यांच्याविषयी आपुलकीची भावना निर्माण झाल्या असून अनेकांनी समाधानही व्यक्त केले.

### संत सेवालाल महाराज

पुढच्या वर्षी पासून ऊसतोडणीसाठी जाऊ देणार नाही त्यांची पूर्ण जबाबदारी मी घेणार आहे तसेच तांडा वस्तीवर जाण्यासाठी रस्ते करून देण्यात येईल व शाळेच्या तीन खोल्या बांधून देतो व समाजातील मुला मुलींनी शिक्षण घेऊन अधिकारी होऊन आई वडिलांचे नाव उज्वल करावे आणि समाजाच्या सर्व समस्या मार्गी लावण्यात येईल असे आश्वासन आ सुरेश धस यांनी दिले. कार्यक्रमानंतर महाप्रसादाचा भाविकांनी लाभघेतला सदरील कार्यक्रम पार पाडण्याकरिता सर्व स्तरातील नागरीकांचे योगदान लाभले. या कार्यक्रमासाठी बंजारा समाजातील महिला तसेच पुरुष मंडळीने पारंपारिक पोशाख परिधान करून हजारोंच्या संख्येने सहभागी झाले होते गावातील सामहिक रॅली पारंपारिक वेशभूषेतील

बंजारा नृत्य, फॅन्सी ड्रेस, मूर्ती पूजन व भोग भंडारा, बंजारा सांस्कृतिक नृत्य, बंजारा गीतांचा नजराणा, विद्यार्थी गुणगौरव बक्षीस वितरण, भव्य रक्तदान व नेत्र तपासणी शिबिर यासह विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

सदर ठिकाणी १३ तांड्यातील लोकांचे सत्कार ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले. भवानीनगर तांडा, चौकी तांडा, लक्ष्मीनगर, सिंगर मळा, कारखेल, गहूखेल, देऊळ घाट, हरेवाडी, जोमदरा, नागझरी, टेकडवाडी या तांडा वस्तीवरील महिला, पुरुष, बाल गोपाळ, वयोवृद्ध मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमास आ सुरेश धस यांनी भेट दिली असता बंजारा समाजाच्या वतीने बंजारा पोशाख घालून त्यांचे जल्लोषात स्वागत केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रमेश राठोड, नितीन राठोड, नवनाथ राठोड, गणेश पवार, धोंडीराम राठोड, प्रकाश राठोड यांच्यासह बंजारा समाजातील जेष्ठ नागरिक युवक, ग्रामस्थांनी परिश्रम घेतले. बंजारा समाजाच्या नेहमीच अडीअडचणीत मदतीला धावून जाणारे आमदार सुरेश आण्णा धस यांचे बंजारा बांधवांनी भव्य स्वागत केले.

### आनंदनगरीत विद्यार्थ्यांची

दुकाने विद्यार्थ्यांनी या आनंदनगरीत थाटली होती. काल्पनिक खेळ, प्रश्नोत्तरातून बक्षिसे, घोडा व उंटावरून सैर आदी विविध प्रकारच्या उपक्रमामुळे आनंदनगरीत विद्यार्थ्यांसह पालकांनी मज्जा केली. विद्यार्थ्यांनी दुकानाद्वारे केलेल्या व्यवहारात जमा खर्च व नफा-तोटा यांचा हिशोब पालकांना समोर करताना आनंद व्यक्त होत होता.अविराज बाळु कोल्हापुरे याने थाटलेल्या छोट्या दुकानात आईस्क्रीम, लस्सी, बदाम सेक, आदी थांडपेयची १०४९० रुपयांची विक्री झाली तर गरमागरम वडापाव भजे विकून सम्राट चंद्रसेन शिंदे याने ९३०० रुपयांचा गल्ला जमवला. ज्ञानराज राहुल जाधव यानेही थंडपेयांची ८९०० रुपयांची विक्री केली. सलग तीन प्रश्नांची उत्तर देऊन चांदीचे नाणे जिंका हा चालता बोलता कार्यक्रम कमाईत अव्वल ठरला.

### आजपासून माजलगाव शहरात

वाजता कल्याणोत्सव श्री बालाजी व पद्मावती देवी विवाह सोहळा अनुभवण्यास मिळणार आहे. तसेच यानंतर प्रतिवर्षाप्रमाणे सर्वधर्मीय विवाह पार पडणार आहेत, या मध्ये भाविकांनी व शिवप्रेमींनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजक बाळू ताकट यांच्यासह शिवजन्मोत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

सेवेचा लाभ घ्यावा

तीन दिवस चालणाऱ्या बालाजी महोत्सव मध्ये अभिषेक, शृंगारपूजा, महाआरती, सहस्त्र नामार्चन यासह विविध पुजेमध्ये सहभागी होण्या करिता भाविकांना निःशुल्क सहभाग घेता येणार आहे. तरी सहभाग घेऊ इच्छिणाऱ्या भाविकांनी जगदीश साखरे मो.९४२२२४३८९१, महेश होके मो. ९८९०९८४०३९, प्रवीण चांडक मो. ७५०७४२१८४२, विनोद लड्डा मो. ९९२२५१२२२२, आंबेकर ऋषी मो. ७८८७६५९३०१ यांच्याकडे नाव नोंदणी करावी, असे आवाहन शिवजन्मोत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

cmyk

# शेतमालाची होणारी नासाडी रोखण्यासाठी रानडुक्कर अन् रोहिंची नसबंदी?

## भाजप आमदाराचे सूतोवाच

रानडुक्कर आणि रोही(नीलगाय) यांच्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतमालाची होणारी नासाडी थांबवण्यासाठी रानडुक्कर व रोही यांची नसबंदी करण्याचा सूतोवाच सावनेरचे भाजप आमदार आशिष देशमुख केला आहे. काटोल तालुक्यातील सावरगाव येथे आयोजित शंकरपटाच्या कार्यक्रमात बोलतांना त्यांनी हे वक्तव्य केले. शेतकऱ्यांना माकडांचा पण खूप त्रास आहे. आम्ही भाजपचे आमदार आहोत, त्यामुळे माकडांची शिकार करणार नाही, मात्र माकडांच्या स्थलांतराची मागणी वन विभागाकडे करणार असल्याचे ही आशिष देशमुख यांनी सांगितले.

आम्ही भाजपचे आमदार आहोत, माकडांची शिकार करणार नाही– आशिष देशमुख

आपल्या सरकारने वीज बिल माफ केलं. विज मीटरसाठी एकही पैसा मोजावा लागत नाही. त्यामुळे तुम्ही आम्हाला आशीर्वाद दिला. लाडक्या बहीणींचे पैसे देणं चालू आहे. त्यामुळे त्यांनी ही आम्हाला आशीर्वाद दिला आहे. किंबहुना शेतकऱ्यांना वन्य प्राण्यांचा मोठा त्रास आहे. सावरगाव येथे देखील वानरांचा मोठा उच्छाद आहे. त्यांच्या बंदोबस्त केला पाहिजे. मात्र आम्ही भाजपचे आमदार आहोत, त्यामुळे आम्ही त्यांना मारणार नाही. मात्र



रानडुक्कर आणि रोही(नीलगाय) यांचं फॅमिली प्लॅनिंग केलं पाहिजे असे वक्तव्य सावनेरचे भाजप आमदार आशिष देशमुख यांनी केलं आहे. शंकरपटाच्या कार्यक्रमात हासीमजाक केला पाहजे असेही ते बोलतांना विसरले नाहीत. त्यामुळे या वक्तव्याचा नेमका अर्थ काय हे स्पष्ट होऊ शकले नाहीये.

बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर शहरानजीक बेलाड मार्गावर मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात व्यक्तीने जवळपास १५ ते १६ शेतकऱ्यांचे शेतात हरभरा आणि मका या पिकांच्या सुडीला आग लावली. या आगीत शेतकऱ्यांचे मोठं नुकसान झालं असून सकाळी ही बाब लक्षात आल्यानंतर शेतकऱ्यांमध्ये एकच खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे गेल्या दोन ते तीन वर्षापासून याच दिवसात या परिसरात अनेकदा अशा अज्ञाताने आग लावण्याच्या घटना घडल्या आहेत. मात्र तरीही पोलीस प्रशासन लक्ष देत नसल्याची तक्रार शेतकऱ्यांनी केली आहे. या घटनेत शेतकऱ्यांचा लाखो रुपयांचे नुकसान झालेलं आहे.

वाशिम जिल्ह्यात कारंजा अमरावती महामार्गाच्या विकास कामादरम्यान कामारगाव दरम्यान असलेल्या रस्त्याच्या कडेला दुर्मिळ असलेले पिवळ्या पळसाचे वृक्ष नष्ट झाले आहे. ही दुर्मिळ वृक्ष नष्ट झाल्याने पर्यावरण प्रेमींचा हिरमोड झालाय. तर त्यामुळे पर्यावरण प्रेमीकडून नाराजी व्यक्त होतय. तंत्रज्ञान अद्यावत झाले असतांना वृक्ष संवर्धनासाठी त्याचा वापर करणे गरजेचे असतांना कामाच्या घाईत बहुमूल्य वृक्ष तोडल्या जात असल्याने परिसरात या बद्दल नाराजी व्यक्त होतय.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६९८ : आजच्या दिवशी औरंगजेब ने जिंजी च्या किल्ल्यावर ताबा केला.
१८०१ : अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीत थॉमस जेफरसन व एरन बर यांना सारखीच मते मिळाली. हाउस ऑफ रिप्रेझेन्टेटिव्हसनी जेफरसन यांना राष्ट्राध्यक्ष तर बर यांना उपाध्यक्ष केले.
१८६७ : आजच्या दिवशी इजिप्तच्या सुएझ कालव्या मधून पहिले जहाज गेले.
१९१५ : आजच्या दिवशी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी शांतीनिकेतन ला भेट दिली.
१९२० : ही दारुबंदी लागू झाली होत.
१९२७ : 'रणदुंदुभि' नाटकाचा पहिला प्रयोग झाला.
१९३३ : अमेरिकेत दारुबंदी समाप्त झाली.
१९६४ : अमेरिकन काँग्रेसचे सगळे मतदारसंघ सारख्याच लोकसंख्येचे असले पाहिजेत असा निर्णय अमेरिकन सर्वोच्च न्यायालयाने दिला.
१९९६ : महासंगणक डीप ब्ल्यू बुद्धिबळात गॅरी कास्पारोव्ह यांच्या कडून पराभूत.
२००८ : कोसोव्होने स्वातंत्र्य जाहीर केले.


### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७८२ : स्वातंत्र्य सैनिक बुधु भगत यांचा जन्म.
१८५४ : फ्रेडरिक क्रूप्प जर्मन उद्योगपती (मृत्यू: २२ नोव्हेंबर १९०२)
१८७४ : थॉमस वॉटसन अमेरिकन उद्योगपती, आय. बी. एम. चे अध्यक्ष (मृत्यू: १९ जून १९५६)
१८९९ : आजच्या दिवशी बंगाल चे प्रसिद्ध कवी जीवनानंद दास यांचा जन्म.
१९५४ : तेलंगणा चे मुख्यमंत्री के.चन्द्रशेखर राव यांचा जन्म.
१९६३ : एनव्हीडिया चे सहसंस्थाक जेन-ह्सून हुआंग यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६०० : सूर्याभोवती पृथ्वी फिरते. सूर्यासारखे अनेक तारे आहेत. त्यांच्याभोवती पृथ्वीसारखे अनेक ग्रह आहेत आणि त्यांच्यावर सजीवसृष्टी असू शकते, असे मत मांडणार्या जिओर्डानो ब्रुनो याला बायबलविरोधी मत मांडल्याबद्दल क्रूसावर बांधून जाळण्यात आले. (जन्म: १५४८)
१८८१ : लहुजी राघोजी साळवे ऊर्फ 'लहुजी वस्ताद' क्रांतीवीर, समाजसेवक (जन्म: १८११)
१८८३ : राजकीय भूमिका घेऊन इंग्रजांविरुद्ध सशस्त्र उठाव करणारे क्रांतिकारकांचे मेरुमणी क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांचे काळ्या पाण्याची शिक्षा भोगत असताना एडन येथे निधन (जन्म: ४ नोव्हेंबर १८४५)
१९६८ : मध्य प्रदेश चे माजी मुख्यमंत्री कैलाश नाथ काटजू यांचे निधन.
१९७८ : पुरुषोत्तम शिवराम रेगे कादंबरीकार, नाटककार, कवी आणि समीक्षक (जन्म: २ ऑगस्ट १९१०)
१९८६ : जे. कृष्णमूर्ती भारतीय तत्त्वज्ञ (जन्म: १२ मे १८९५)
१९८८ : बिहारचे ११ वे मुख्यमंत्री कापुरी ठाकूर यांचे निधन. (जन्म: २४ जानेवारी १९२४)
१९९४ : गुजरात चे माजी मुख्यमंत्री चिमनभाई पटेल यांचे निधन.
२०१७ : हिंदी साहित्यकार वेद प्रकाश शर्मा यांचे निधन.

# गाजर गवत तणांचे एकात्मिक नियंत्रण



महाराष्ट्र राज्यात गाजर गवत हे पाढंरीफुली, चटकचांदणी, ओसाडी व कॉग्रेसगवत अशा अनेक नावाने ओळखले जाते. गाजर गवत हे एक परदेशी तण असून याला शास्त्रीय भाषेत पार्थेनियम हिस्टोरियो फोरस असे म्हणतात. गाजर गवताचे मुळस्थान अमेरिकेतील मेक्सिको असून जागातील इतर देशात या तनाचा प्रसार मेक्सिको पासून झालेला आहे. गाजर गवताच्या एका झाडाला साधारणंत: १००० पर्यंत फूले येऊ शकतात व एका झाडापासून १० ते १५ हजार बिया निर्माण होऊ शकतात. इतके सर्व बी सुमारे अडीच ते तीन एकर जमीन व्यापून टाकू शकते. बी काळसर लंब वर्तुळकार, लहान आणि वजनाने हलके असते. बियात दोन अनुबंध असतात. त्यामुळे ते वाऱ्याने सहज उडून जाऊन तणाचा प्रसार होतो.

गाजर गवत तणांचा प्रसार : या गवताचा प्रादुर्भाव व प्रसार हा शेतीमधील बांधव शेताच्या बाजूचे बांध, पडीक जमीन, चराऊ कुरणे, औद्योगिक वसाहती, महामार्ग, रेल्वेमार्ग, महामार्गाच्या दुतर्फा, नदी-नाले, तलाव इत्यादी ठिकाणी हे तण मोठ्या प्रमाणात आढळुन येते. तसेच शेतातील जवळ पास सर्वच पिकांमध्ये उदा. तुर, कापुस, ज्वारी, भुईमुग, ऊस, भाजीपाला व फळपिके यामध्ये सुध्दा आढळुन येते.

गाजर गवतामुळे आरोग्यावर होणारे दुष्परिणाम : गाजर गवताच्या फुलामधील परागकणामुळे माणसांना विविध प्रकारची ॲलर्जी होते. उदा. सर्दी, शिंका, अंग खाजणे, दमा, श्वसणाचा त्रास, त्वाचा विकार इत्यादी. वनस्पतीत आढळणाऱ्या पार्थेनीनया ग्लुकोसाईड शिवाय काही ॲक्लोईडस सुध्दा आढळतात. या तणाशी माणसाचा संपर्क आलातर त्वचारोग, एक्झीमा व अस्थमा या सारखे विकार होतात. शेतातील पिकाबरोबर अन्नासांठी स्पर्धा केल्यामुळे उत्पादनात घट आणि पडीक जमिनीतील जनावरांच्या चराई क्षेत्रात घट येते. परागकणांमुळे तेलबिया, भाजीपाला व फळे इत्यादी पिकांच्या उत्पादनात घट होते. तसेच मुळाद्वारे जमिनीत विषारी रसायने सोडल्यामुळे पिकाच्या उत्पादनात घट होते.

गाजर गवताचे प्रतिबंधात्मक उपाययोजना : शेतातील गाजर गवत फुलावर येण्यापूर्वी मुळा सकट उपट्टुन काढावे. कंपोस्टखड्डे, ओलीताचे दांड, शेतातील बांध, शेताच्या कडेचे बांध, रेल्वे लाईन्स, रस्ते पडीक जमीनी इत्यादी. ठिकाणचे गाजर गवत संपुर्णत: मुळासकट उपटुन टाकावे व त्याचा ढिग करुन वाळल्यानंतर जाळावे. यामुळे पहिल्या पावसात उगवुन आलेले गाजर गवताचे उच्चाटन होईल. पावसाळा संपल्यावर वाळलेले गाजर गवत दक्षता घेऊन जाळून टाकावे.

गाजर गवताचे नैसर्गिक नियत्रंण : विविध लागवड पध्दतीप्रमाणे विविध पिकांची फेरबदल करुन ही गाजर गवताची समस्या कमी करता येऊ शकते उदा. ज्वारी, झेंडु, धैंचा, बरसीम आदीमुळे प्रसार कमी होतो त्याची वाढ खुंडते.

यांत्रिक पदध्तीने गाजर गवत नियत्रंण : यंत्राच्या साह्याने किंवा विळयाने गाजर गवत मुळासकट काढावे व त्यांची विल्हेवाट लावावी. योग्य प्रकारे नष्ट न केल्यास ते पुन्हा उगवू शकते, यासाठी पावसाळा हा चांगला काळ आहे. हाताने गाजर गवत उपटताना हातमोज्याचा वापर करावा.

गाजर गवताची निर्मुलनात्मक उपाययोजना : गाजर गवत हे सर्वच ठिकाणी वाढत असल्यामुळे संघटीतरित्या शेतकरी, ग्रामपंचायती, शैक्षणिक संस्था, शास्त्रज्ञ यांच्या साह्याने ग्रामीण भागात जागरुकता निर्माण करावी. त्यासाठी कार्यशाळा, चर्चासत्रे व कार्यक्रम यांचा उपयोग होईल. गाजर गवताकडे सामाजिक दक्षतेचा विषय म्हणून पाहून त्यानुसार नियोजन करावे. म्हणून एकाच वेळी सामुहिकरित्या गाजर गवत फुलावर येण्यापूर्वी नष्ट केल्यास गाजर गवत वाढीस आळा बसू शकेल, म्हणून या तणाच्या नियत्रंणासाठी दरवर्षी १६ ते २२ ऑगस्ट या सप्ताहात संपूर्ण भारतात गाजर गवत जनजागृती मोहिम राबविली जाते.

# असे करा मक्यावरील लष्करी अळीचे यशस्वी व्यवस्थापन

फॉल आर्मी वर्म (लष्करी अळी) शास्त्रीय नाव स्पोडोप्टेरा फ्रुगीपर्डा ही अमेरिकेत मका पिकावर येणारी महत्वाची कीड आहे. भारतात जून २०१८ मध्ये सर्व प्रथम दक्षिण कर्नाटकातील काही जिल्ह्यांमध्ये या किडीची नोंद झाली. महाराष्ट्रात देखील मागील दोन वर्षापासून ही कीड मका, मधुमका, ज्वारी, बाजरी, भात ही तृणधान्य पिके तसेच कापूस, सोयाबीन, ऊस या पिकांना देखील मोठ्या प्रमाणावर प्रादुर्भाव करतांना आढळते आहे.सदर कीड बहुभक्षी असून ८० पेक्षा जास्त वनस्पतींवर उपजिविका करते. परिणामी सर्वच हंगामामध्ये किडीसाठी यजमान वनस्पती सहजपणे उपलब्ध होत असल्याकारणाने सदर किडीचे व्यवस्थापन करतांना काळजी घेण्याची गरज आहे.

प्रवास क्षमता : या किडीचा पतंग एका रात्रीत सुमारे १०० कि. मी.पर्यंत तर वाऱ्याचा वेग अनुकूल राहिल्यास ३० तासात १६०० कि. मी.पर्यंत गेल्याची नोंद आहे. यामुळे दुर्गम भागातील मका पिक शोधून तिथेही सहजपणे अंडी घालू शकत असल्याने जवळपास सर्वच जिल्ह्यात मका पिकावर या किडीचा प्रादूर्भाव दिसून येत आहे.

प्रजनन क्षमता : या किडीचे जीवनक्रम वर्षभर चालू असते. सदर किडीची प्रजनन क्षमता प्रचंड असून मादी तिच्या जीवनक्रमात सुमारे १ ते २ हजार अंडी घालते व त्यामुळे अल्पावधीतच किडीच्या संख्येत प्रचंड वाढ होते.



नुकसानीचा प्रकार : लष्करी अळीचा प्रादूर्भाव मका पिकावर सर्वच अवस्थांमध्ये आढळून येतो. अळ्या सुरुवातीस समुहाने राहतात पानांचा पृष्ठभाग खरबडून खातात. पहिल्या व दुसऱ्या अवस्थेतील अळ्यांनी पानांचा हिरवा पापुद्रा खाल्ल्यामुळे पांढरे चट्टे पडल्याचे दिसते. मोठ्या झाल्यावर अळ्या वेगवेगळ्या होतात. ही कीड स्वजातीय भक्षक असल्यामुळे एका पोग्यांत एक किंवा दोनच अळ्या आढळून येतात. तिसऱ्या अवस्थेतील अळ्या पोंग्यामध्ये शिरून पाने खायला सुरुवात करतात. त्यामुळे पोग्यांतून बाहेर आलेल्या पानांवर एकारेषेत एकसमान छिद्रे दिसून येतात. पाचव्या अवस्थेतील अळी पोग्यामंध्ये राहून पाने खात असल्याने मोठ्या आकाराची छिद्रे दिसतात. सहाव्या अवस्थेतील अळी अतिशय खादाड असून अधाशीपणे पाने खाते व पोग्यामंध्ये मोठ्या प्रमाणात विष्टा टाकलेली आढळते या अवस्थेत मक्याची पाने झडल्यासारखी दिसतात. बऱ्याच वेळा अळी कणसाच्या बाजूने आवरणास छिद्रे करून आतील दाणे देखील खाते.

पिक अवस्थेनुरूप करावयाचे व्यवस्थापन : मका पिक शेवटची पोंग्यांची अवस्था ते तुरा अवस्थेत असल्याने त्वरित उपाययोजना केल्यास लष्करी अळीमुळे होणारे नुकसान टाळता येईल.सर्वेक्षण :पिकाचे आठवड्यातून दोन वेळा नियमित सर्वेक्षण केल्यास वेळीच अळीचा प्रादूर्भाव ओळखणे शक्य होते. त्याकरिता प्रत्यक्ष शेताचे निरीक्षण करतांना शेतात नागमोडी किंवा इंग्रजी अक्षरासारखे फिरून पाच ठिकाणे व प्रत्येक २० झाडे किंवा दहा ठिकाणे व १० झाडे निवडावीत. प्रादूर्भावग्रस्त झाडांची टक्केवारी काढण्यास एकरी एवढे पुरेसे आहे. समजा २० झाडांपैकी २ झाडे प्रादुर्भावीत असतील तर नुकसान पातळी १० टक्के आहे असे समजावे व अर्थिक नुकसान संकेत पातळी लक्षात घेऊन त्वरित उपाययोजना कराव्यात.

प्रत्यक्ष शेताचे निरीक्षण : मध्यम पोंग्यांची अवस्थेमध्ये (उगवणीनंतर ५ ते ६ आठवडे) १० टक्के प्रादुर्भावग्रस्त झाडे दिसून येताच त्वरित उपाययोजना करावी. शेवटची पोंग्याची अवस्थेमध्ये (उगवणीनंतर ७ आठवडे) २० टक्के प्रादुर्भावग्रस्त झाडे दिसून येताच त्वरीत उपाययोजना करावी. तर तुर्याच्या अवस्थेमध्ये (उगवणीनंतर ८ आठवडे) फवारणी टाळावी मात्र १० टक्के प्रादुर्भावग्रस्त कणसे असल्यास फवारणी करावी.

# कोबी भाजीवरील बुरशीजन्य रोग आणि नियंत्रण

कोबीवर्गीय भाजीपाल्यावर पडणाऱ्या विविध प्रकारच्या रोगांमुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. केवडा व घाण्या या रोगामुळे काही वेळा सुमारे ६० ते ७० टक्क्यापर्यंत नुकसान होते. त्यामुळे शेतकऱ्यांना कोबीवर्गीय भाजीपाल्यावरील रोगांची व त्यावरील उपायांची माहिती असणे गरजेचे आहे.

कोबीवर्गीय फळभाजीमध्ये पानकोबी, फुलकोबी, नवलकोल इत्यादी भाज्याच्या समावेश होतो आणि त्यावर विविध प्रकारच्या रोगांमुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. केवडा व घाण्या या रोगामुळे काही वेळा सुमारे ६० ते ७० टक्केपर्यंत नुकसान होते, काही वेळा निरनिराळ्या रोगांची झाडावर दिसणारी लक्षणे एकसारखीच असतात, अशावेळी पिकांवर चुकीच्या औषधांची फवारणी केली जाते, त्यामुळे शेतकऱ्यांना कोबीवर्गीय फळभाजीवरील रोगांची व त्यावरील उपायांची माहिती असणे गरजेचे आहे.

१. रोपे कोलमडणे (डॅपिंग ऑफ) : हा रोग जमिनीत वाढणाऱ्या बुरशीपासून होतो. या रोगाची लागण रोपवाटिकेतील रोपांवर प्रामुख्याने उष्ण आणि दमट हवामानात, पाण्याचा योग्य निचरा न होणाऱ्या जमिनीत होतो. बुरशीची लागण झालेली रोपे निस्तेज पिवळसर दिसतात. रोपांचे जमिनीलगतचे खोड कुजून रोपे कोलमडतात. उपाय : या रोगाची लागण पावसाळी हंगामात जास्त प्रमाणात होते म्हणून पावसाळी हंगामात रोपे नेहमी पाण्याचा उत्तम निचरा असलेल्या ठिकाणी गादीवाफ्यावर तयार करावीत. पेरणीपूर्वी १३ ग्रॅम कॅप्टान किंवा फायटेलॉन १० लिटर पाण्यात मिसळून हे द्रावण गादीवाफ्यावर झारीने शिंपडावे. तसेच पेरणीपूर्वी बियाणास कॅप्टान किंवा थायरम हे औषध एक किलो बियाणास दोन ग्रॅम या प्रमाणात चोळावे. २. काळी कूज (ब्लॅक लेग) : हा बुरशीजन्य रोग पावसाळी हंगामात बहुतेक सर्व भागात आढळतो. या रोगाचा प्रसार बियाणात वाढणार्या बुरशीपासून होतो. त्यामुळे रोपाच्या वाढीच्या सुरुवातीसच रोगाचा प्रादुर्भाव होतो. रोगाचा प्रादुर्भाव झालेल्या रोपांची सर्व मुळे खालून वरच्या भागाकडे कुजत जाऊन रोप सुकून कोलमडते. रोपाचे खोड उभे कापल्यास आतील



भाग काळा झालेला दिसतो. उपाय : या रोगाचा प्रसार बियाणामार्फत होत असल्यामुळे लागवडीपूर्वी बियाणाचे निर्जंतुकीकरण करावे. यासाठी एक ग्रॅम मर्क्युरिक क्लोराईड एक लिटर पाण्यात मिसळून तयार केलेल्या द्रावणात पानकोबी किंवा फुलकोबीचे बियाणे ३० मिनिटे बुडवून नंतर सावलीत सुकवावे आणि पेरणीसाठी वापरावे. काळीकूज या रोगाला सहनशील किंवा प्रतिकारक असणाऱ्या जाती लागवडीसाठी वापराव्यात. उदा : पानकोबीची पुसा ड्रमहेड ही काळीकूज या रोगाला सहनशील जात लागवडीसाठी निवडावी. ३. केवडा (डाऊनी मिल्डयू) : केवडा हा बुरशीजन्य रोग कोबीवर्गीय पिकांवर सर्वच भागात आढळून येतो. रोगग्रस्त पानांवर पिवळसर किंवा जांभळट रंगाचे डाग दिसतात. पानाच्या खालच्या भागावर त्या ठिकाणी भुरकट केवड्याच्या बुरशीची वाढ झालेली दिसते. गड्ड्याची काढणी लांबल्यास काळपट चट्टे दिसतात आणि असे गड्डे सडू लागतात. पावसाळी दमट हवेत हा रोग झपाट्याने पसरतो. उपाय : रोगाला पोषक हवामान आढळून आल्यास किंवा रोगाची प्राथमिक लक्षणे दिसल्यास पिकावर एक टक्के बोर्डो मिश्रण फवारावे किंवा दहा लिटर पाण्यात २६ ग्रॅम या प्रमाणात (०.२ टक्के) डायथेन एम-४५ हे औषध मिसळून दहा दिवसांच्या अंतराने दोन फवारण्या कराव्यात. फुलकोबीच्या स्नोबॉल, एम.जी. एस.जी.एस. २-३, सिलेक्शन १.६.१.४ सिलेक्शन-८, १२-सी इ. जाती केवडा रोगाला प्रतिकारक आहेत.

महत्त्वाच्या गोष्ट : काकडीचे असे करा पीक संरक्षण : ४. करपा (ब्लॅक स्पॉट) : या बुरशीजन्य रोगाचा प्रसार बियाणात वाढणार्या बुरशीपासून होतो. बुरशीचा प्रादुर्भाव झालेल्या रोपांची पाने, देठ आणि खोडावर वर्तुळाकार किंवा लंबगोल काळसर झालेला सर्व भाग करपल्यासारखा काळपट रंगाचा दिसतो. कोबी आणि फुलकोबीच्या तयार गड्ड्यावर तसेच बियाणे तयार होण्याच्या काळात रोगाचा प्रादुर्भाव दिसून येतो. अशा रोगट झाडापासून तयार झालेल्या बियाणातून रोगाचा प्रसार होतो.

उपाय : या रोगाच्या नियंत्रणासाठी पिकावर एक टक्के बोर्डो मिश्रण फवारावे किंवा दहा लिटर पाण्यात २६ ग्रॅम या प्रमाणात (०.२ टक्के ) डायथेन एम-४५ हे बुरशीनाशक औषध मिसळून फवारणी करावी. ५. भुरी (वापडरी मिल्डयू) : कोबीवर्गीय पिकांवर भुरी हा बुरशीजन्य क्वचित प्रसंगी आढळतो. सुरुवातीला पानांच्या वरच्या बाजूला पांढऱ्या रंगाचे ठिपके दिसतात. काही काळाने संपूर्ण पानावर करड्या पांढरट रंगाची बुरशी वाढलेली दिसते. उपाय : या रोगाच्या नियंत्रणासाठी रोगाची लागण दिसून येताच दहा लिटर पाण्यात ३७ ग्रॅम पाण्यात विरघळणारा गंधक (८०टक्के) या प्रमाणात फवारणी करावी. ६. मुळकुजव्या (क्लबरूट) : या बुरशीजन्य रोगामुळे झाडाच्या मुळांवर अनियमित गाठी तयार होतात. झाडाची पाने पिवळी पडतात आणि सुकतात. ज्या जमिनीचा सामू सात पेक्षा कमी आहे अशा जमिनीत या रोगाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर आढळतो.उपाय : जमिनीत चुना टाकून जमिनीचा आम्ल-विम्ल निर्देशांक वाढवा. रोपाच्या लागवडीपूर्वी रोपे एक ग्रॅम मर्क्युरिक क्लोराईड दीड लिटर पाण्यात मिसळून तयार केलेल्या द्रावणात बुडवून नंतर रोपांची लागवड करावी.

# पवनचक्की कंपन्यांचा मनमानी कारभार

## विनासहमती शेतातून पवनचक्की उभारणी साहित्याची वाहतूक

## मुळुकवाडी येथील शेतकऱ्यांची तक्रार





लिंबागणेश। प्रतिनिधी

बीड तालुक्यातील बालाघाटावर पवन ऊर्जा प्रकल्प कंपन्या संच उभारताना नियम व अटींचे पालन करत नसुन मनमानी कारभार करत आहेत.त्यामुळे पवन ऊर्जा प्रकल्प संदर्भात जमीन खरेदी व्यवहारात गैरप्रकार तसेच संपादीत जमिनीपेक्षा जास्तीचे अतिक्रमण करणे, ठरलेला जमिनीचा मोबदला देण्यास टाळाटाळ करणे,कराराचे पालन न करणे आणि जाब विचारला असता शेतकऱ्यांना दमदाटी करणे आदी प्रकारच्या शेतकऱ्यांच्या तक्रारी वाढल्या आहेत.त्यातच आता शेतकऱ्यांच्या सहमती विना परवाना कोणाताही मोबदला न देताच शेत जमीनीमधुन गट क्रमांक ६५७ मधील ६२ आर शेतजमीनी मधुन रिन्यु ग्रीन एम.एच.पी.वन प्रायव्हेट लिमिटेड नवी दिल्ली ही कंपनी पवनचक्की उभारणी करत असुन कंपनीने दि.९ फेब्रुवारी पासून आमच्या शेत जमीनीमधुन माझ्या कुटुंबाच्या संहमतीशिवाय पवनचक्की प्रकल्प उभारण्यासाठी पोकलेन, जेसीबी, जीप,पिक अप अशा विविध वाहनांची वाहतूक करत असुन हे नियमबाह्य व माझ्या शेतजमीनीचे नुकसान करणारे आहे.त्यामुळे सदरील कंपनीस माझ्या शेतातुन वाहतूक करण्यास प्रतिबंध करण्यात यावा अशी लेखी तक्रार रोहित सुरेश ढास यांनी जिल्हाधिकारी व पोलिस अधिक्षक बीड यांना केली आहे. पवनचक्की कंपन्यांच्या मनमानी कारभार विरोधात वारंवार तक्रारी येऊन सुद्धा उर्जा प्रकल्प संदर्भातील जिल्हा स्तरीय आणि तालुकास्तरीय संनियंत्रण समित्या केवळ कागदावरच असुन प्रत्यक्षात पिडीत शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यास असमर्थ असल्याची खंत सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी व्यक्त केली.

महाराष्ट्र शासनाच्या उद्योग ऊर्जा आणि कामगार विभागाने दि.२१ ऑक्टोबर २०१३ रोजी पवन ऊर्जा प्रकल्प जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय नियंत्रण समित्यांची स्थापना केलेली आहे. या समित्यांना पवन ऊर्जा प्रकल्पाशी निगडित असलेल्या जमिनीच्या व्यवहारांबाबत कायदेशीर बाबी व अनिश्चितता तपासणे तसेच पवन ऊर्जा प्रकल्पाशी निगडित असलेल्या जमिनीच्या व्यवहारांमध्ये योग्य व्यावहारिक व मोबदला मिळत असल्याबाबत खात्री करणे. पवन ऊर्जा प्रकल्पाबाबत समितीकडे आलेल्या तक्रारींची चौकशी करून त्यावर योग्य ती कारवाई करणे. आणि जिल्ह्यातील पवन ऊर्जा प्रकल्पांच्या अनुषंगाने उद्भवणाऱ्या अडचणींचे निराकरण करणे .त्याचप्रमाणे शेतजमिन मालक ,शेतकरी आणि ग्रामस्थ आणि प्रकल्प विकासक यांच्यामध्ये समन्वय ठेवणे. प्रकल्प उभारण्यासाठी व प्रकल्प कार्यरत राहण्यासाठी स्थानिक स्तरावरचे सर्व प्रकारचे सहाय्य करणे इत्यादी अधिकार यांना दिलेले आहेत. पवन ऊर्जा प्रकल्प जिल्हास्तरीय संनियत्रण समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी आहेत तर मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद आणि पोलीस अधीक्षक सदस्य आहेत त्याचप्रमाणे उपविभागीय स्तरावर असलेल्या सनियंत्रण समितीमध्ये उपविभागीय अधिकारी अध्यक्ष तर तहसीलदार समन्वयक अथवा सचिव आहेत .मात्र या समित्या केवळ कागदावर असून पवन ऊर्जा प्रकल्प संदर्भात शेतकऱ्यांच्या तक्रारीकडे जिल्हा प्रशासन जाणिवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप पिडीत शेतकरी करत आहेत.त्यामुळे कागदावरील समित्या प्रत्यक्षात उतरणे गरजेचे आहे असे मत सामाजिक कार्यकर्ते डॉक्टर यांनी व्यक्त केले आहे.

## संत सेवालाल महाराजांचे विचार प्रेरणा देणारे आहेत -जयदत्त क्षीरसागर



बीड । प्रतिनिधी

अनेक संकटातून सेवालाल महाराजांनी सर्व समाजाला बाहेर काढून एक मोठी क्रांती केली. एक क्रांतीकारी संत म्हणून त्यांची ओळख आहे. त्यांचे विचार अनेक पिढ्यांना प्रेरणा देणारे आहेत असे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले.

श्री संत सेवालाल महाराजांची २८६ वी जयंती सर्वत्र उत्साहात साजरी करण्यात आली. जयंतीनिमित्त दि.१५ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, विलास बडगे, दिनकर कदम, नानासाहेब काकडे, कवी प्रा.अरूण पवार, विरा राठोड, सुरेश राठोड, शंकर राठोड, निता राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलतांना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, क्रांतीकारी संत सेवालाल महाराज हे भारतातील सर्व बंजारा समाजाचे आराध्य दैवत आहेत. बंजारा समाजामध्ये खर्या अर्थाने जो सामाजिक बदल झाला, जी क्रांती झाली त्या सामाजिक क्रांतीचे आद्यप्रवर्तक म्हणजे क्रांतीकारी संत सेवालाल महाराज आहेत. गोर गणाचे भटके जीवन व भटक्या जीवनातील हाल अपेष्टा, पशुमय अवस्था पाहुण या अवस्थेतून बाहेर काढण्यासाठी सद्गुरू सेवालाल महाराजांनी गोर जन जागृतीचे वृत स्विकारले.

या जागृतीसाठी अजीवन ब्रम्हचारी राहण्याचा निर्णय घेतला. परावलंबी दुसर्यांच्या भरवश्यावर राहू नये असा उपदेश सेवालाल महाराजांनी केला. तुमच्यावर लोक भरवसा ठेवतील असे वर्तन करा. दुसर्यांच्या मदतीची अपेक्षा करू नका, जो हिंमत करील त्याला यश आवश्य मिळेल असे सांगून सर्व समाजाचे कल्याण करण्याचे काम त्यांनी केले.

म्हणून येणार्या अनेक पिढ्यांना त्यांचे विचार प्रेरणा देणारे आहेत. त्यांचे विचार आत्मसाद करणे गरजेचे आहे असे त्यांनी यावेळी सांगितले. याप्रसंगी बाबासाहेब चव्हाण, अर्जुन चव्हाण, डॉ.जगन्नाथ चव्हाण, आबासाहेब चव्हाण, अंकुश राठोड, बी.एम.पवार, भुषण पवार, सचिन पवार, परमेश्वर चव्हाण, विठ्ठल पवार, सुशिल पवार, बिभीषण राठोड, विलास राठोड यांच्यासह महिला पुरूषांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



## तुलसी इंग्लिश स्कूलचे चंपावती महोत्सवात यश

बीड । प्रतिनिधी

बीड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे संपन्न झालेल्या जिल्हास्तरीय चंपावती महोत्सवात तुलसी इंग्लिश स्कूल, संत ज्ञानेश्वर नगर, बीड. च्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. जिल्हास्तरीय चंपावती महोत्सवाच्या वतीने चित्रकला, समूह नृत्य, वैयक्तिक नृत्य, जोडी नृत्य, समूहगीत गायन, रांगोळी आधी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

तुलसी इंग्लिश स्कूल बीड येथील विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवून सोलो डान्स स्पर्धा (वर्ग १ ली ते ३ गट) मध्ये इयत्ता ३ री मधील विद्यार्थिनी कु. अनघा काळे प्रथम क्रमांकाने विजेती ठरली, तर जोडी नृत्या मध्ये कु .जान्हवी महांवर आणि कु.भूमी महांवर या द्वितीय क्रमांकाने विजेत्या ठरल्या. वयक्तिक गीतगायन स्पर्धा मध्ये , कु. जान्हवी महानवर हिने द्वितीय क्रमांक मिळवला,तर पृथ्वीराज पौळ या विद्यार्थ्याने वैयक्तिक नृत्य मध्ये तिसरा क्रमांक मिळविला. त्यांच्या या उत्स्फूर्त यशाबद्दल त्यांच्यासह त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शाळेतील सहशिक्षिका स्मिता महानवर व जया ससाणे मॅडम या शिक्षकांचे अभिनंदन, देवगिरी प्रतिष्ठान चे अध्यक्ष आदरणीय प्रा. प्रदीप रोडे सर ,शाळेच्या प्राचार्या उमा जगतकर मॅडम व शाळेतील सर्व शिक्षक- शिक्षकांच्या वतीने करण्यात आले. आपल्या पाल्याच्या घवघवीत यशाबद्दल पालकांनीही आनंद व्यक्त केला.

## माजलगाव मध्ये संत रविदास महाराज यांची ६४८ वी जयंती हर्ष उल्हासात साजरी

माजलगाव । प्रतिनिधी

**संत रविदास महाराज यांची ६४८ वी जयंती शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात मोठ्या हर्षउल्हासात साजरी करण्यात आली येथील माजी आमदार मोहन सोळंके यांच्या हस्ते करुन ज्योत प्रज्वलित करण्यात आली.या वेळी रा.काँ.पर्टीचे मतदार प्रमुख मोहन जगताप यांचे प्रतिनिधी अजय जगताप,छत्रपती सा.का.संचालक संतोष यादव,क्रांती सेना संस्थापक अध्यक्ष राजेश घोडे,भाजप तालुकाध्यक्ष अरुण राऊत,कृषी उत्पन्न बाजार समीतीचे उपसभापती श्रीहारी मोरे,राष्ट्रीय काँग्रेसचे.नेते दत्ता कांबळे,पी आर पी तालुकाध्यक्ष राकेश साळवे,अशोक वाघमारे,प्रल्हाद दळवी,किसनराव भिसे हे उपस्थित होते.**

जयंती कमीटीच्या वतीने उपस्थित पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले सुत्रसंचलन अशोक वाडेकर यांनी केले . दिवसभरात सर्व पक्षांच्या नेत्यांनी अभिवादनासाठी हजरी लावली रा.काँ.पर्टी माजलगाव मतदार प्रमुख नारायणराव डक,रा.काँ.पार्टीचे नेते दयानंद स्वामी, संपादक शिवाजी रांजवण,वंचित बहुजन अघाडी जेष्ठ नेते धम्मानंद साळवे,पत्रकार संघाचे अध्यक्ष उमेश मोगरेकर, शिवसेना तालुका प्रमुख तुकाराम येवले,माजी नगराध्यक्ष डॉ अशोक तिडके, उपनगराध्यक्ष अविनाश जवळे, भाजप नेते प्रशांत पाटील, शेख रशीद,लहुजी सेना संस्थापक अध्यक्ष भास्कर शिंदे तसेच पोलिस निरीक्षक राहुल सुर्यतळ आणि सर्व नेते व समाज बांधवांनीं भेट देऊन अभिवादन केले कमीटीच्या वतीने राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे जिल्हाध्यक्ष नानासाहेब घोडके, जयंती अध्यक्ष कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव हारीभाऊ सवने,भाजप नेते सत्यनारायण उनवणे,युवा जिल्हाध्यक्ष राजेश जाधव,तालुकाध्यक्ष सुभाष कांबळे उठाव महासंघाचे जिल्हाध्यक्ष सचिन कांबळे व समाजाच्या वतीने सर्वांचे स्वागत करण्यात आले.या वेळी बोलताना जिल्हाध्यक्ष नानासाहेब घोडके यांनी सर्व भारतीयांना संत रविदास महाराज जयंती निमित्त सुभेच्छा देऊन रविदास महाराज यांच्या कार्यावर मत व्यक्त केले तसेच वंचित बहुजन अघाडी उपजिल्हाध्यक्ष सचिन उजगरे यांनी संत रविदास महाराज व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याविषयी मत व्यक्त करुन सुभेच्छा दिल्या या जयंती निमित्त कमीटी अध्यक्ष हारीभाऊ सवने यांनी संत रविदास महाराज यांची मुर्ती जयंतीसाठी उपलब्ध करून दिली समाजाच्या वतीने सत्कार करुन स्वागत केले तसेच पी के ग्रुपचे अध्यक्ष पद्माकर कांबळे यांनी सर्वांना महाप्रसाद म्हणून जेवण दिले त्याबद्दल त्यांचा सत्कार करुन स्वागत केले . या कार्यक्रमाची सांगता रात्री ८:०० वाजता संत गुरू रविदास महाराज यांची जयंती अध्यक्ष हारभाऊ सवने सहपत्नीक महा आरती करून सांगता करण्यात आली .कार्यक्रमास योगदान देणारे सत्यनारायण उनवणे,माजी जिल्हा परिषद अध्यक्ष रामप्रभु साळुंके,योगेश शिंदे,रमेश जगताप,दिलीप सोनवणे,भगवान सोनवणे,राधाकिसन भाळशेंकर, रामकीसन सोनवणे,अशोक गवळी, बालाजी कांबळे सर, तुकाराम लोकरे सर,बाबासाहेब माने,सचिन वाघमारे,वसंत वाघमारे,संतोष जाधव,संतोष खंडागळे,अर्जुन पोहेकर व सर्व समाज बांधवांनी योगदान दिले.

## जिल्हा वाहतुक शाखेची उल्लेखनीय कामगिरी

### चोरीचे वाहन २४ तासाच्या आत सापडून दिले

बीड। प्रतिनिधी

शहरात सद्यस्थितीला पोलीस अधिक्षक नवनीत कावत, अप्पर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक सुभाष सानप यांच्या सहकार्याने सध्या वाहतुकीचे नियम मोडणार्यांवर पोलीसांनी चांगलीच कार्यवाही सुरु केली असून गेल्या आठवड्यातच २०० रिक्षाचालकांवर दंडात्मक स्वरुपाची कार्यवाही केली होती त्यामुळे रिक्षाचालकांना देखील वाहतुकीच्या नियम मोडल्यामुळे तसेच कागदपत्रे नसल्याने कार्यवाहीचा चांगलाच दणका बसला होता.दि.१५ फेब्रुवारी २०२५ रोजी विशाल संजय कुलकर्णी (रा.आदित्य नगर, बीड) यांची मोटारसायकल २४ तासाच्या आत सापडून देण्याची उल्लेखनिय कामगिरी जिल्हा वाहतुक शाखेने केली आहे



त्यामुळे नागरिकांत पोलीसांच्या कामगिरीविषयी समाधान व्यक्त होत आहे.याबाबत माहिती अशी की, दि.१५ फेब्रुवारी २०२५ रोजी विशाल संजय कुलकर्णी (रा.आदित्य नगरी, बीड) यांची मोटारसायकल काल शनिवार रोजी अज्ञात चोराने चोरुन नेली होती ती मोटारसायकल जिल्हा वाहतुक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर, वसुदेव मिसाळ, बजरंग कुटुंबरे, सोबत पोलीस हवालदार राजाभाऊ तांदळे, महिला पोलीस शिपाई अनिता पवार, पोलीस हवालदार नितीन शिंदे, विष्णु काकडे, पोलीस नाईक अजिनाथ मुंडे, पोलीस कॉन्स्टेबल वसीम शेख व चालक पोलीस हवालदार हरके यांच्या टीमने शहरातील साठे चौकात वाहतुक नियमांचे उल्लंघन करत असतांना सदरील संशयित मोटारचालक सुनिल गणपत शिंदे (रा.वासनवाडी) यास पोलीसांनी पकडले व त्याच्यावर दंडात्मक कारवाई करत असतांना डिवायएसवर मुळ मालक यांचा मोबाईल नंबर मिळाला त्यांना भ्रमणध्वनीवर संपर्क केला असता त्यांनी सांगितले की कालच माझे वाहन चोरीला गेले याबाबत मी शिवाजीनगर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिलेली आहे त्यानंतर सदरील वाहतुक शाखेच्या पोलीस अधिकारी आणि कर्मचार्यांनी चोरीची पडताळणी करत पुष्टी केली व आरोपीस पोलीस स्टेशन शिवाजीनगर यांच्या ताब्यात दिले. यामुळे वाहन चोरी करणार्या आरोपींचे चांगलेच धाबे दणाणले असून नागरिकांतून पोलीसांविषयी समाधान व्यक्त केले जात आहे.

## आदित्य पॉलिटेक्निक महाविद्यालयात नैसर्गिक संसाधनाचे संरक्षण

### राहूल गिरी यांच्याकडून २०० विद्यार्थ्यांना पाणी बचतीचे धडे



बीड। प्रतिनिधी

शहरातील आदित्य शिक्षण संस्थेच्या आदित्य पॉलिटेक्निक महाविद्यालयाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी नैसर्गिक संसाधनाच्या संरक्षण विषयी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत युनीसेफ़ चे जिल्हा समन्वयक राहूल गिरी यांनी विद्यार्थ्यांना पाणी बचतीची वेगवेगळे फायदे, कोणकोणत्या पद्धतीत आपण पाणी वाचवू शकतो. व्हाय वेस्ट या अॅपच्या माध्यमातून मिळणारे प्रमाणपत्र व त्याचा आपल्या भविष्यासाठी लागणारा उपयोग. तसेच युनिस्को च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्यांच्यातलं असणार ज्ञान प्रदर्शित करण्यासाठी मिळणाऱ्या विविध राज्यस्तरीय आंतरराज्य संधी. पाणी बचत केल्यामुळे होणारे फायदे व आपल्यामध्ये होणारा बदल. याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. शुक्रवार ७ फेब्रुवारी आयोजित कार्यशाळेला महाविद्यालयातील २०० विद्यार्थी, विद्यार्थीनी सहभागी झाले होते.

विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनात पाणी बचतीचे महत्व कळावे, त्यांना पाणी बचतीसंदर्भात सवय लागावी यासाठी आदित्य पॉलिटेक्निक महाविद्यालयाच्या वतीने संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्रजी सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा, प्राचार्य डॉ. राहुल खडके यांच्या मार्गदर्शनाखाली नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण आणि जलसंधारण हे अभियान राबवण्यात आले. व्यासपिठावर जिल्हा समन्वयक राहूल गिरी, प्रा. करवार, शासकीय तंत्र निकेतन महाविद्यालयाच्या प्रा. वावरे, आदित्य पॉलिटेक्निक चे प्राचार्य डॉ. राहुल खडके, आदित्य इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल चे प्राचार्य डॉ. सुरवसे यांची उपस्थिती होती. यावेळी राहूल गिरी यांनी व्हाय वेस्ट या अॅपच्या माध्यमातून आपण पाणी बचत या अभियानांतर्गत कसे काम करू शकतो. याबद्दलही सविस्तर माहिती दिली. त्या अॅपमध्ये नोंदणी कशी करायची व त्या अॅप मध्ये आपण केलेले पाणी बचतीचे कार्य याची नोंदणी कशी करायची याबद्दल ही त्यांनी मार्गदर्शन केले.

पुढे बोलताना ते म्हणाले की, आपल्या मनःस्थितीमध्ये परिवर्तन करणे आवश्यक आहे. एकदा मनस्थिती बदलली की आपल्या अंगी ती सवय लागून आपण नेहमीची पाणी बचत करण्याचा प्रयत्न करतो. पाणी बचत अभियानामध्ये आपण कमी वेळेमध्ये जास्तीत जास्त काम कसं करू शकतो याच्याबद्दलही त्यांनी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. लक्ष्मण तांबे यांनी तर आभार प्रा. शेख कौसर यांनी मानले. कार्यक्रमाला एस.आय. शेख, पी.डी. दुधाळ, ए.एल. दुधाळ, एस. एम. राठोड, डी. एस. राऊत, एस.बी. शहाणे, वाघमोडे, मोराळे, पवार, सवासे, जाधव, कोरडे, सानप, कडू, प्रतीक्षा जाधव यांची उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शेख एस.आय. यांनी परिश्रम घेतले.

## जोपर्यंत विमा भेटणार नाही; तोपर्यंत मागे हटणार नाही !

### किसान सभेचा आक्रमक पवित्रा

बीड । प्रतिनिधी

सन २०२४ च्या खरीप हंगामातील विविध पिकांचा पिकविमा शेतकऱ्यांनी एग्रीकल्चर इन्शुरन्स कंपनीकडे भरला होता. मात्र यावर्षीच्या हंगामात सततचा पाऊस झाल्यामुळे शेतात पाणी साचून राहिले. यामुळे बऱ्याच ठिकाणची पिके पाण्यात गेली. त्याच्या वैयक्तिक तक्रारी पिक विमा कंपनीकडे शेतकऱ्यांनी केल्या मात्र आद्यप देखील जिल्ह्यातील हजारो बाधित शेतकऱ्यांना पीक विमा पदरात पडलेला नाही.कागदोपत्री आदेश दाखवत शेतकऱ्यांचे सोयाबीन सरकारने खरेदी करणे बंद केले आणि खरीप हंगामातील पीक विमा विविध कारणे दाखवत शेतकऱ्यांना डावलने अशी सरकारची भूमिका असल्याने जे पर्यन्त शेतकऱ्यांच्या पदरात पीक विमा पडणार नाही तो पर्यंत मागार नाही अशी ठाम भूमिका घेत अखिल भारतीय किसान सभा बीड कडून विमा कंपनी कार्यलयासमोर बेमुदत धरणे आंदोलन आज सोमवार दि १६ पासून करण्यात येणार आहे.

जिल्हाभरातील बहुतांश महसूल मंडळात सप्टेंबर महिन्यात अतिवृष्टी होऊन पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. या पीक नुकसानीच्या तक्रारीचे प्रमाण २५% च्या पुढे गेल्याने तरतुदीनुसार रँडम सर्वे करून व्यापक नुकसान झाल्याचे निदर्शनास आले. अशा वेळी पिक विमा कंपनीने शेतकऱ्यांना तातडीचा दिलासा म्हणून २५% पिक विमा ग्रीम वितरित करण्याचे निर्देश पिक विमा प्रावधानात आहेत या नुसार केवळ ६ लाख ५९ हजार सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांनाच हे एग्रीम घोषित झाले पण अद्याप पर्यंत मिळाले नाही. वास्तविक पाहता सर्वच पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले असल्यामुळे सर्वच पिकांसाठी हे पिक विमा ग्रीम मिळणे अपेक्षित होते.तसेच विविध टप्प्यावर नुकसान झालेल्या व त्या नुकसानाचे क्लेम केल्यापैकी २ लाख ४४ हजार शेतकरी नुकसान भरपाईस पात्र ठरुण ही विम्याचे पैसे शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा झाले नाहीत. या सर्व प्रश्नावर दि ४ फेब्रुवारी रोजी किसान सभेच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी समक्ष जिल्हा पिक विमा प्रतिनिधी यांच्याकडे या पिक विमा वितरणाची मागणी केली मात्र विमा कंपनी शासनाकडून शेतकरी हिस्स्याची रक्कम मिळाली नसल्याची सबब पुढे करून हे पिकविमा वितरण टाळत असल्याची बाब समोर आली. तसेच २०२३ चा रब्बी पिकविमा व २०२३ च्या रिव्ह्यू झालेल्या तक्रारींची लॉगिनला दिसणारी पिक विम्याची रक्कम तात्काळ वितरित करण्यात यावी म्हणून अखिल भारतीय किसान सभेने दि ७ फेब्रुवारी रोजी निवेदन देऊन पुढील दहा दिवसात या सर्व पीक विम्याचे वितरण करण्याची मागणी विमा कंपनीकडे केली.अद्याप देखील विमा कंपनीकडून मागणीची योग्य दखल न घेतल्याने किसान सभेकडून आक्रमण भूमिका घेत सोमवार दि १७ पासून हजारो शेतकरी एग्रीकल्चर इन्शुरन्स कंपनी च्या बीड जिल्हा कार्यालयासमोर जोपर्यंत आपल्या खात्यावर विमा पडणार नाही तोपर्यंत बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येणार आहे.या शेतकरी हीत हक्काच्या लढ्यात आपण हजारोच्या संख्येने उपस्थित रहावे असे आव्हान बीड जिल्हा किसान सभेच्या वतीने करण्यात येत आहे.

# माणूस किती जगला, यापेक्षा कसा जगला याला महत्व-ह.भ.प.महारुद्र महाराज खाडे

केज । प्रतिनिधी

**कुस्ती, वारकरी संप्रदाय, राजकीय क्षेत्रातील सुपरिचित व्यक्तिमत्व मधुकर खाडे महाराज हे अल्पकाळ जगले. माणूस किती जगला, यापेक्षा कसा जगला, याला अधिक महत्व आहे, असे मत अंबाजोगाई तालुक्यातील उमराई येथील शिवगड संस्थानचे संस्थापक ह.भ.प. महारुद्र महाराज खाडे शास्त्री यांनी व्यक्त केले.**

वै.पै.मधुकर महाराज खाडे यांचे दि.६ फेब्रुवारी रोजी अपघाती निधन झाले. त्यानिमित्ताने केज तालुक्यातील होळ येथील श्री संत भगवान बाबा मंदिरात दि.१३ ते १९ फेब्रुवारी दरम्यान किर्तन सप्ताह आयोजित केला आहे. भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे माजी विद्यार्थी असलेले ह.भ.प. महारुद्र महाराज खाडे शास्त्री हे शुक्रवारी (दि.१४) किर्तन सेवेप्रसंगी बोलत होते. यावेळी होळ येथील संत भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ह.भ.प.डॉ. प्रल्हाद महाराज ढाकणे शास्त्री यांची उपस्थिती होती.

महाराजांनी किर्तन सेवेसाठी संत तुकाराम महाराज यांचा 'देह तुझ्या पायी । ठेवूनि जालो उतराई ।।१।। आता माझ्या जीवा । करणे ते करी देवा ।।ध्रु.।। बहु अपराधी । मतिमंद हीनबुद्धि ।।२।। तुका म्हणे नेणे । भावभक्तीची लक्षणे ।।३।।' हा अभंग घेतला होता. ह.भ.प. महारुद्र महाराज खाडे म्हणाले, मधुकर खाडे महाराज यांनी कुस्ती, वारकरी संप्रदाय, राजकारणात सक्रियपणे




### होळ येथे वै.पै.मधुकर महाराज खाडे यांच्या स्मरणार्थ किर्तन

कार्य केले. तिन्ही क्षेत्रात एकाचवेळी काम करण्याची हातोटी त्यांच्याकडे होती. आयुष्यात प्रयत्न करणे आपल्या हातात आहे, फळाची प्राप्ती न करता कार्य करणे महत्वाचे असते. हा विचार घेऊन मधुकर महाराज खाडे यांनी निष्ठेने आयुष्यभर परमार्थ केला. संत तुकाराम महाराज यांचे विचार आचरणात आणले. माणूस किती जगला, यापेक्षा कसा जगला याला अधिक महत्व आहे. अल्पकाळ जगून खाडे महाराज यांनी सेवेत असताना देह सोडला. देवा तुझ्या पायाच्या ठिकाणी माझा देह ठेवून तुझ्या उपकारातून उतराई झालो आहे. देवा माझ्या जीवाचे आता तुला जे काही करायचे असेल ते कर, असे संत तुकाराम महाराज म्हणतात. अगदी त्यांच्या विचारांप्रमाणे सेवेत असताना मधुकर महाराज खाडे यांनी देह सोडला. त्यांचे कुस्ती, वारकरी संप्रदायातील कार्य पुढे नेणे हीच श्रद्धांजली ठरेल, असे मत ह.भ.प. महारुद्र महाराज खाडे शास्त्री यांनी व्यक्त केले. यावेळी होळचे ग्रामस्थ, संत भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे पदाधिकारी, आजी-माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### होळ येथे अर्जुन महाराज लटपटे यांचे आज किर्तन

ह.भ.प.अर्जुन महाराज लटपटे हे मूळचे गंगाखेड तालुक्यातील कोद्रीचे रहिवासी आणि होळ येथील श्री संत भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे सहसचिव, माजी विद्यार्थी आहेत. मधुकर महाराज खाडे यांच्या स्मरणार्थ किर्तन सप्ताह सुरू असून रविवारी (दि.१५) अर्जुन महाराज लटपटे यांचे किर्तन होणार आहे. कीर्तनास उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## युसूफवडगाव विद्यालयाचे इंटरनॅशनल ओलंपियाड स्पर्धेत घवघवीत यश





युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगांव येथील युसूफवडगांव माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयाने नॅशनल सायन्स ओलंपियाड फाउंडेशन नवी दिल्ली मार्फत घेण्यात आलेल्या इंटरनॅशनल इंग्लिश ओलंपियाड स्पर्धा परीक्षा तसेच इंटरनॅशनल जनरल नॉलेज स्पर्धा परिक्षेमध्ये नेत्र दिपक यश मिळविले असून,विद्यालयातील तीन विद्यार्थिनींनी सुवर्णपदके मिळविले आहेत.

या विद्यालयाच्या इयत्ता सहावी मधील विद्यार्थिनी कु.समृद्धी मल्लिकार्जुन गडकर हिने विद्यालयातून वर्गातून प्रथम क्रमांक पटकावला आहे तसेच इयत्ता दहावी मधून कु.वैष्णवी बालासाहेब राऊत हिने प्रथम क्रमांक पटकावला आहे तसेच इंटरनॅशनल जनरल नॉलेज ऑलिंपियाड स्पर्धा परीक्षा मध्ये इयत्ता दहावी मधून कु.सिद्धी चंद्रकांत थळकरी हिने प्रथम क्रमांक मिळविला आहे.या सर्व यशस्वी विद्यार्थिनींना नॅशनल सायन्स ओलंपियाड फाउंडेशन () नवी दिल्ली यांच्यामार्फत गोल्ड मेडल तसेच अप्रेनसिएशन प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहे.नुकताच या परीक्षेचा निकाल लागला असून तसे एन.एस.ओ. नवी दिल्ली मार्फत विद्यालयास पत्र प्राप्त झाले आहे.याबद्दल संस्थेचे सचिव दीपक दादा घुमरे, अध्यक्ष यु.बी.सुकाळे,प्राचार्य भोसले ए. यु,पर्यवेक्षक आर.बी व शिक्षकवृंद पालक,नागरिक यांनी अभिनंदन केले आहे.



**महाराष्ट्र लोकसेवा आयोग सरळ सेवा भरती परीक्षेच्या माध्यमातून शासनाच्या विविध विभागांमध्ये, शासकीय सेवेत निवड झालेल्या, आष्टी विधानसभा मतदारसंघातील विद्यार्थ्यांचा माझ्या निवासस्थानी सन्मान केला व या यशस्वी विद्यार्थ्यांना पुढील प्रशासकीय सेवेसाठी शुभेच्छा दिल्या. महसूल सहाय्यक १) प्रवीण बाळासाहेब भोसले (बळेवाडी ता.आष्टी) २) सुंदर महादेव कटाळे (कठाळवाडी, ता.पाटोदा) मुंबई पोलीस १) भारत बनकर पवार (अमळनेर ता.पाटोदा) २) अनिकेत प्रमोद नाईक (पारगाव चौधरी ता.आष्टी) ३) कानिफनाथ गहिनीनाथ गर्जे (सुरडी, ता.आष्टी) ४) गणेश देवगुणे (पारगाव जोगेश्वरी ता.आष्टी) १) बिबीशन रावडे (बळेवाडी ता.आष्टी)**

# शिरूर तालुक्यातून जाणाऱ्या राज्य मार्गावर महावितरणने रोवलेले पोल मागे हटवण्याचे काम सुरू

## उपसभापती जालिंदर सानप यांनी केलेल्या मागणीची तातडीने घेतली दखल

शिरूर कासार । प्रतिनिधी

शिरूर कासार तालुक्यातून जाणाऱ्या राज्य क्रमांक ५९ या मार्गाचे काम संपुष्टात आले असून महावितरण च्या गुत्तेदार महाशयाने नवीन लाईट कनेक्शन घेऊन जाण्यासाठी राज्यमार्गाच्या कडेलाच विद्युत पोल उभे केल्याने मोठ्या प्रमाणावर अपघात होऊ लागले असल्याने मानूर, पिंपळनेर फाटा नागरेवाडी या परिसरातील माहिती मिळताच शिरूर पंचायत समितीचे उपसभापती जालिंदर सानप यांनी तात्काळ सा.बां चे उपअभियंता यांच्याकडे याबाबत एका निवेदनाद्वारे माहिती देऊन याबाबत सबंधीतांवर कार्यवाही करून रोडलगत रोवलेले पोल मागे हटण्याची मागणी केली असता तात्काळ याची दखल घेऊन हे पोलची लाईन मागे घेण्याचे काम सुरू करण्यात आलेआहे.



शिरूर कासार तालुक्यातून राज्य क्रमांक ५९ राज्य मार्ग राजुरी हिवर शिंगा, खोकरमोहा ,रायमोहा, नागरेवाडी, आनंदगाव, शिरूर, वारणी, लोणी, पिंपळनेर फाटा, मानूर, ते चिंचपूर असा असुन या राज्य मार्गाचे डांबरीकरणाचे काम संपुष्टात आले असून महावितरण कंपनीच्या गुत्तेदार महाशयाने महामार्गाच्या हद्दीमधील रस्त्याच्या कडेला अनेक गावांमध्ये नवीन लाईट ओढण्याचे कामे केली पोलही रोवल्याने अपघातास आमंत्रणच होऊ लागले तालुक्यातील मानूर ते पिंपळनेर फाटा तसेच नाग-या चीवाडी या भागात हा प्रकार उघडकीस आल्यानंतर याबाबतीत शिरूर कासार पंचायत समितीचे उपसभापती जालिंदर सानप यांनी महामार्गाचे उपअभियंता तसेच महावितरण कंपनीचे अधिकारी तहसीलदार यांना ही बाब निदर्शनास आणून दिली व हे काम थांबवून पोलिल मागे हटवण्याची मागणी केली याची संबंधित ◀◀ पान ३ वर

# आपला परिवाराच्या मनीषा पवार यांचा देहदानाचा संकल्प

## ज्येष्ठ समाजसेविका विना गोखले यांच्या वाढदिवसानिमित्त घेतला निर्णय

बीड । प्रतिनिधी

जिवंतपणी सामाजिक कार्यात योगदान दिले. मात्र मरणानंतरही देहाचा उपयोग समाजासाठी व्हावा या उदात्त हेतूने नेकनूर येथील आपला परिवारच्या संचालक मनीषा पवार यांनी देहदानाचा संकल्प केला आहे. ज्येष्ठ समाजसेविका विना गोखले यांच्या वाढदिवसानिमित्त पवार यांनी हा संकल्प केला आहे. या संबंधीचे प्रतिज्ञापत्र १० फेब्रुवारी रोजी अंबाजोगाईच्या स्वा.ती.ग्रा.शा.वै.म.शरीर रचना शास्त्र विभाग प्रमुखांच्या सहीनिशी मनिषा पवार यांना दिले आहे.



ज्येष्ठ समाजसेविका विना गोखले या आर्टिस्ट्री संस्थेच्या माध्यमातून सामाजिक संस्थांसाठी मोठे काम करत आहेत. पुणे मुंबई व ठाणे येथे विविध विषयात काम करणाऱ्या सामाजिक संस्थांना सहाय्य करण्यासाठी 'देणे समाजाचे' हा उपक्रम गेल्या वीस वर्षांपासून चालवत आहेत. या माध्यमातून निमशहरी,ग्रामीण दुर्गम व अतिदुर्गम भागातील सामाजिक संस्थांना मदत करणे हा मुख्य उद्देश असतो. ८ जानेवारीला त्यांचा वाढदिवस झाला. याचे औचित्य साधून ७ जानेवारी रोजी मनिषा पवार यांनी देहदानाचा फॉर्म भरून दिला होता. या संबंधीचे प्रतिज्ञापत्र १० फेब्रुवारी रोजी अंबाजोगाईच्या स्वा.ती.ग्रा.शा.वै.म.शरीर रचना शास्त्र विभाग प्रमुखांच्या सहीनिशी मनिषा पवार यांना दिले आहे. मनीषा पवार या नेकनूर जवळील कळसंबर येथे आपला परिवार वृद्धाश्रम चालवत आहेत. इथे अंध अपंग निराधार व बेघर आजी-आजोबांची सेवा व सुश्रुषा केली जाते.या संस्थेला शासनाचे कसलेही अनुदान नसून फक्त लोकसहभागावरच सदरील संस्था चालते.या कामी त्यांचा परिवार त्यांना मदत करतो.मृत्यू पश्चातही आपल्या शरीराचा समाजाला उपयोग व्हावा म्हणून त्यांनी हा निर्णय घेतला असून,त्यांच्या कुटुंबीयांनी या निर्णयाला सहमती दर्शविली आहे.या निर्णयामुळे समाजातून त्यांचे कौतुक होत आहे.

### संत सेवालाल महाराज यांच्या जयंतीनिमित्त पारंपरिक पोशाखात बंजारा समाजाची भव्य रॅली

# बंजारा बांधवांनी आमदार सुरेश धस यांचे केले भव्य स्वागत

आष्टी । प्रतिनिधी

तालुक्यातील १३ तांडा येथील बंजारा समाज बांधवांच्या वतीने संत सेवालाल महाराज यांची २८६ वी जयंती आष्टी तालुक्यातील वाघळुज येथील भवानीनगर तांडा येथे मोठ्या उत्साहात जल्लोषात विविध कार्यक्रमाने साजरी करण्यात आली धानोरा येथून पारंपरिक पोशाखात बंजारा समाजाच्या भव्य रॅलीचे आयोजन वाघळूज पर्यंत करण्यात आले होते. यामध्ये आष्टी तालुक्यातील १३ तांड्यातील ग्रामस्थ पुरुष, महिला, लहान मुले



हजारोच्या संख्येने बंजारा बांधवासह सर्व जाती धर्माचे नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते. जगदुरू संत सेवालाल महाराज सार्वजनिक जयंती उत्सव

पारंपरिक पोशाखात

व सकल १३ तांडा येथील बंजारा समाजाच्या वतीने सकाळी १० वाजता धानोरा ते वाघळूज बंजारा पेहरावात भव्य रॅली काढण्यात आली मान्यवरांच्या हस्ते संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन झाले आणि संत सेवालाल महाराज की जय, असा जयघोष करत रॅलीला प्रारंभ झाला वाघळुज येथील भवानीनगर तांडा येथे रॅलीची सांगता झाली यावेळी आ. सुरेश धस यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना आ.धस म्हणाले की बंजारा समाजाप्रती माझी सेवा आहे. बंजारा समाज प्रामाणिक समाज आहे. बंजारा समाजातील बरेच लोक ऊसतोडणीसाठी जातात ◀◀ पान ३ वर

# संत सेवालाल महाराज जयंतीनिमित्त अभिवादन

## रक्तदान शिबिर व राज्यस्तरीय कवी संमेलन सोहळा उत्साहात

बीड । प्रतिनिधी

दिनांक १५ फेब्रुवारी रोजी बीड शहरामध्ये राष्ट्रसंत क्रांतिकारी सेवालाल महाराज यांच्या २८६ जयंतीनिमित्त संत सेवालाल महाराज चौक जालना रोड बीड या ठिकाणी सकाळी ८.३० वाजता चौकाचे सुशोभीकरण केल्यामुळे संत सेवालाल महाराज यांची प्रतिमा चौकात बसवण्यात आली. सकाळी संत सेवालाल महाराज यांचा जळभोग करण्यात आला. संत सेवालाल महाराजांचा भोगासाठी ज्येष्ठ, श्रेष्ठ,मान्यवर यांच्या हस्ते भोग लावण्यात आला. यानंतर संत सेवालाल महाराज व



माता जगदंबा यांची आरदास (इति) करण्यात आली. बीड तालुक्याचे प्रथम नागरिक, लोकप्रिय आमदार आदरणीय ◀◀ पान ३ वर

# माजलगाव शहरात घरफोडी; तीन लाखाचा मुद्देमाल लंपास

माजलगाव । प्रतिनिधी

घरात कोणीच नसल्याचे पाहून कुलूप तोडून प्रवेश केलेल्या चोरट्यांनी सोने चांदी सह पावणेतीन लाखाचा मुद्देमाल चोरून नेल्याची घटना गुरुवारी माजलगाव शहरातील शिवाजीनगर परिसरात घडली

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार शिवाजीनगर मध्ये राहणारे आसाराम नानाभाऊ कोरडे वय ५२ वर्ष यांच्या घरात कोणीच नसल्याचे पाहून अज्ञात चोरट्यांनी घरात प्रवेश केला. कपाटाचे लॉकर तोडून ६ तोळे २ ग्राम सोन्या,चांदीचे दागिने किंमत १ लाख ७९ हजार रु व नगदी ९० हजार रुपये असे दोन लाख ७९ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. ही घटना गुरुवारी घडली. दरम्यान याप्रकरणी माजलगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहे.

# आजपासून माजलगाव शहरात तीन दिवसीय तिरुपती बालाजी महोत्सवाची सुरुवात

माजलगाव । प्रतिनिधी

शिवसेवाभावी संस्थेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमीत्त आयोजित श्रीमद्? भागवत कथेसह किर्तन महोत्सवाची सांगता उत्साहात पार पडली. आज दि १७ फेब्रुवारी सोमवार रोजी पासुन तिरुपती बालाजी देवस्थान येथील श्रीनिवास कल्याणम्? महोत्सवाची सुरुवात होणार आहे.तीन दिवस चालणारा हा उत्सव महाराष्ट्रात प्रथमच माजलगावकरांना श्रीदेवी व भुदेवी भगवान स्वामी व्यंकटेश्वरा सोबत दिव्य लग्नाची अनुभुती लाभणार असून यामध्ये भाविकांनी मोठ्या शाखेने सहभागी व्हावे,असे आवाहन आयोजक बाळू ताकट यांनी केले आहे.

माजलगावकरांना शिवजन्मोत्सव समिती माजलगाव च्या वतीने यावर्षी अनेक धार्मिक सामाजिक सांस्कृतिक कार्यक्रमाची मेजवानी मिळाली. यामध्ये नुकतेच दि.८ ते दि.१४ फेब्रुवारी दरम्यान श्रीमद्? भागवत कथा,दि.१४ ते दि.१६ फेब्रुवारी या तीन दिवस कीर्तन महोत्सव हे कार्यक्रम पार पडले. तसेच आत्ता आज दि १७ फेब्रुवारी सोमवार पासून तिरुपती बालाजी देवस्थान येथे होणारा बालाजी महोत्सवाची अनुभूती प्रथमच महाराष्ट्रात माजलगावकरांना अनुभवण्यास मिळणार आहे. याची सुरुवात शहरातील मंगलनाथ मैदान येथे आज दि.१७ फेब्रुवारी सोमवार पासून मंगळवार, बुधवार असे तीन दिवस चालणार आहे. यामध्ये आज दि.१७ फेब्रुवारी सोमवार रोजी सकाळी.५:०० वाजता सुप्रभात सेवा, सकाळी.६:३० वाजता सहस्त्र नामार्चन,



### महाराष्ट्रात पहिल्यांदाच माजलगावकरांना तिरुपती देवस्थानची अनुभूती -बाळू ताकट

सकाळी.७:३० वाजता प्रभोद सेवा, सकाळी ८:३० वाजता अभिषेक, सकाळी.११:३० वाजता श्रृंगारपुजा, दुपारी.१२:०० वाजता महाभोग व आरती, सायंकाळी ६:१५ वाजता दिपोत्सव व झुलोत्सव, सायंकाळी ७:३५ वाजता महाआरती व मंगळवार दि.१८ फेब्रुवारी रोजी सकाळी ५:०० वाजता सुप्रभात सेवा,सकाळी ६:३० वाजता मुल्यमूर्ती बालाजी महाअभिषेक सकाळी ९:०० वाजता तोमाला वस्त्र सेवा, सकाळी १०:३० वा.हवन, सायंकाळी ५ वाजता लक्ष तुलसी अर्चना, रातौ ८:०० वाजता महाआरती तर बुधवार दि.१९ फेब्रुवारी रोजी सकाळी १०:०० वाजता कुंकुमार्चन, दुपारी ४:०० वाजता पालखी सोहळा, सायंकाळी ६:०० ◀◀ पान ३ वर

# आनंदनगरीत विद्यार्थ्यांची लाखोंची कमाई

दिंद्रुड । प्रतिनिधी

शालेय शिक्षणासोबतच व्यवहारिक ज्ञान प्राप्त व्हावे या उद्देशाने माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील व्यंकटेश पब्लिक स्कूलने शनिवारी आनंदनगरीचे आयोजन केले होते. आनंदनगरी मध्ये चिमुकल्यांनी थाटलेल्या छोट्या छोट्या दुकानातून लाखो रुपयांची उलाढाल झाली. विक्री केलेल्या वस्तूंपासून मुलांनी चांगली कमाई केली. दरम्यान भाग्यशाली बक्षिसांच्या सोडत मध्ये वॉशिंग मशिन, सीलिंग फॅन, इस्त्री, टिफीन डब्बा आदी बक्षिसांची लयलूट करण्यात आली.



आनंदनगरीचे उद्घाटन हभप उद्धव महाराज ठोंबरे व डॉ.रमेश गटकळ यांच्या शुभहस्ते झाले. संस्थाध्यक्ष प्रदीप ठोंबरे, बंडूजी खांडेकर, प्रकाश काशीद, संतोष स्वामी, अमोल ठोंबरे,दत्ता डाके, दिपक बोरचाटे, जवळा सरपंच त्रिंबक साबळे, गणेश काटकर,नितीन वाघमोडे,शिंदेवाडी उपसरपंच बालासाहेब शिंदे आदी मान्यवर याप्रसंगी उपस्थित होते. विठ्ठल - रखुमाई व देवी सरस्वतीचे प्रतिमापूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

लहान मुलांना शिक्षणाबरोबरच व्यवहार चातुर्य, नफा-तोटा, उत्तम गुणवत्तेच्या सामानाची खरेदी- विक्री हे ज्ञान विकसित होण्यासाठी व्यंकटेश पब्लिक स्कूलने शालेय स्तरावर आनंद नगरी या कार्यक्रमाचे आयोजन शनिवारी केले होते. मासवडी-बाजरीची भाकरी, भाजीपाला, कपडालत्ता, आईस्क्रीम, फ्रुट्स सह विविध प्रकारच्या खाद्यपदार्थांची ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# ती कुस्ती पुन्हा होणार? महाराष्ट्र केसरीतील अंतिम लढतीची फेरतपासणी, ५ जणांची समिती

पुणे । प्रतिनिधी

अहिल्यानगर येथे पार पडलेल्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत यंदा शिवराज राक्षे विरुद्ध पृथ्वीराज मोहोळ यांच्यात अंतिम लढत झाली. मात्र, या लढतीत चितपट नियमान्वये पृथ्वीराज मोहोळला बाद देत पैलवान पृथ्वीराज मोहोळला विजयी घोषित करण्यात आले. पण, पंचाच्या या निर्णयावर आक्षेप घेत शिवराज राक्षेनं विचारणा केली, त्यावेळी राग अनावर झाल्याने त्याने थेट पंचाची कॉलर पकडून लाथ मारली. शिवराजचा हा व्हिडिओ सोशल मीडियावर आणि माध्यमांमध्ये तुफान व्हायरल झाला. त्यामुळे, महाराष्ट्रभर महाराष्ट्र केसरी कुस्ती (ज्ञ्ीहींळ) स्पर्धेवर शंका उपस्थित करत महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघावरही प्रश्न उपस्थित केले



होते. त्यामुळे, या संघटनेची व महाराष्ट्र केसरी कुस्ती परिषदेची देकील मोठी बदनामी झाले आहे. तर, काहींनी ही कुस्ती पुन्हा घेण्याची मागणीही केली होती. अखेर, महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाने महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेतील अंतिम लढतीबाबत मोठा निर्णय घेतला आहे.

अहिल्यानगर येथे पार पडलेल्या महाराष्ट्र केसरी २०२५ कुस्ती स्पर्धेतील अंतिम लढतीत पंचानी दिलेल्या निकालाची चौकशी करण्यासाठी समिती नेमण्यात आली आहे. कुस्ती क्षेत्राशी संबंधित ५ जणांची चौकशी समिती गठीत करण्यात आली असून विलास कथुरे यांना या समितीचे अध्यक्ष बनविण्यात आले आहे. तसेच, या समितीने २८ फेब्रुवारीपर्यंत शिवराज राक्षे आणि पृथ्वीराज मोहोळ यांच्यात रंगलेल्या अंतिम लढतीसंदर्भात अहवाल देण्याच्या सूचनाही महाराष्ट्र कुस्तीगीर परिषदेकडून करण्यात आल्या आहेत. त्यामुळे, या कुस्तीचा अंतिम निकाल आता समितीचा अहवाल आल्यानंतरच स्पष्ट होईल. दरम्यान, विलास कथुरे हे महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे उपाध्यक्ष आहेत.

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, दिनांक २९ जानेवारी ते २ फेब्रुवारी २०२५ रोजी अहील्यानगर येथे ६७ वी वरिष्ठ राज्य अजिंक्यपद महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा संपन्न झाली. सदर स्पर्धेमध्ये महाराष्ट्र केसरी खुल्या गटातील गादी विभागामध्ये अंतिम फेरीत पै.पृथ्वीराज मोहोळ विरुद्ध पै. शिवराज राक्षे ही कुस्ती झाली. या कुस्तीस मुख्य पंच म्हणुन छ. संभाजीनगर येथील आंतराष्ट्रीय पंच नितेश काचुलिया, मॅट चेअरमन म्हणून शासकीय कोच पै. दत्तात्रय माने व साईड पंच म्हणून विवेक नाईक यांची नेमणुक करण्यात आली होती. सदर कुस्तीच्या निकालवरुन बराच गदरीळ झाला, स्पर्धा संपल्यानंतर जनमानसात सुध्दा निकालावरून नाराजी व्यक्त होताना दिसली.

# रेशन दुकानांमध्ये आयुष्मान कार्डसाठी गर्दी

पिंपरी । प्रतिनिधी

शहरातील रास्त भाव धान्य दुकानांमध्ये आयुष्मान कार्ड काढण्यासाठी नागरिकांची गर्दी होत आहे. राज्य शासनाच्या सूचनेनुसार अन्नधान्य वितरण कार्यालयांतर्गत (पुणे) हे कार्ड काढण्यात येत आहेत. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या आशा सेविकांच्या माध्यमातून हे कार्ड काढले जात आहेत.

आयुष्मान भारत कार्डचे लाभार्थी हे रेशन दुकानांतून धान्य घेणारे लाभार्थी आहेत. धान्य वितरण करताना जी प्रणाली अवलंबली जाते, त्याच प्रणालीने आयुष्मान कार्ड काढण्याची प्रक्रिया पूर्ण केली जाते. त्यामुळे कार्ड काढण्यासाठी ही प्रक्रिया



पूर्ण केल्यानंतर पुढील २४ तासांमध्ये कार्ड अपडेट होऊन त्याची प्रिंट कार्डधारकाला घेता येते. त्याबाबतचा मेसेज कार्डधारकांना मोबाईलवर पाठविला जातो.

ई-सेवा केंद्रांमध्येदेखील ही सुविधा सुरू आहे. मात्र, गेल्या वर्षापासून शहरातील ३१७ रास्त भाव धान्य दुकानांमध्येदेखील ही कार्यवाही सुरू केली आहे.

दरम्यान, चालू वर्षात गेल्या रविवारपासून (दि. ९) रेशनकार्ड दुकानांमध्ये हे कार्ड काढण्याचे काम सुरू झाले आहे. त्यासाठी रेशन दुकानांमध्ये गर्दी होत आहे. ज्या नागरिकांनी आयुष्मान कार्ड काढले आहे, त्या नागरिकांना ५ लाख रुपयांपर्यंतचे आरोग्य विमा संरक्षण मिळते. नोंदणीकृत रुग्णालयांमध्ये त्यांना त्याबाबतची सुविधा दिली जात आहे.

# सुभाष भानुसघरे यांना महाराष्ट्र रत्न पुरस्कार

कार्ला : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा देवघर या शाळेचे मुख्याध्यापक सुभाष ज्ञानदेव भानुसघरे यांना शैक्षणिक, सामाजिक व आध्यात्मिक क्षेत्रातील योगदानासाठी महाराष्ट्र राज्य विश्वनाथ फाउंडेशन व इनफोर्डड यांच्या संयुक्त विद्यमाने यंदाचा महाराष्ट्र रत्न पुरस्कार २०२५ जाहीर करण्यात आला आहे.




२८ फेब्रुवारी रोजी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले स्मारक पुणे येथे या पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे. मावळ तालुक्यात प्रथमच एखाद्या व्यक्तीस हा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल भानुसघरे यांचे अभिनंदन होत आहे. फाउंडेशनचे सचिव ॲड. शंकरराव चव्हाण यांनी ही माहिती दिली.

# अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीसाठी ५४ कोटी

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यातील अल्पसंख्याक समाजातील वैद्यकीय, तांत्रिक व व्यावसायिक अभ्यासक्रमात, तसेच इयत्ता बारावीनंतर सर्व अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेत असलेल्या आर्थिकदृष्ट्या कमकुवत व गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्ती योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी ५४ कोटी ५५ लाख रुपयांचा निधी वितरित करण्यास मान्यता मिळाली आहे.




तंत्रशिक्षण संचालनालय संचालक यांच्या पत्रान्वये करण्यात आलेल्या मागणीस अनुसरून संबंधित कार्यालयास शैक्षणिक वर्ष सन २०२०-२१, २०२१-२२, २०२२-२३, २०२३-२४ व सन २०२४-२५ मध्ये अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीसाठी निधी देण्यास मंजुरी मिळाली आहे.

पाचही शैक्षणिक वर्षांतील शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरलेल्या अल्पसंख्याक समुदायातील विद्यार्थ्यांना शिष्यवृती वितरीत करण्यासाठी ही रक्कम तंत्र शिक्षण संचालनालयाचे संचालक यांच्या स्वाधीन करण्यात येत असून, संचालक हे नियंत्रक अधिकारी म्हणून काम पाहतील.


पात्र ठरलेल्या ज्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीची रक्कम प्रलंबित आहे अशा विद्यार्थ्यांची प्रलंबित रक्कम वितरीत केलेल्या निधीतून भागविण्यास मान्यता देण्यात आली आहे. रकमेतून प्रलंबित रक्कम वितरीत केल्यानंतर तरतूद शिल्लक राहिल्यास ती सन २०२४-२५ च्या लाभार्थी विद्यार्थ्यांच्या शिष्यवृतीसाठी उपयोगात आणली जाणार आहे

# जीबीएसची लागण पाण्यामुळे नाही तर कोंबड्यांमुळे; अजित पवारांची धक्कादायक

पुणे । प्रतिनिधी

पुण्यानंतर राज्यभरात आता जीबीएस आजाराचे रुग्ण आढळून येत आहे. राज्यात जीबीएसमुळे मृत्यू झालेल्या रुग्णांची संख्या ९ वर पोहोचली आहे. मुंबई, पुणे सोलापूर, नागपूरमध्ये जीबीएस रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. यातच आता गुलियन बॅरी सिंड्रोम अर्थात जीबीएस फक्त दुषित पाण्यामुळेच नाही तर कोंबड्यांमुळे या आजाराची लागण होत असल्याची माहिती उमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली आहे. कच्चे मांस खाल्ल्यामुळे जीबीएसची लागण होत आहे, असंही अजित पवार यांनी स्पष्ट केलं.

नेमकं काय म्हणाले अजित पवार?



जीबीएस हा आजार पाण्यामुळे झाल्याची चर्चा होती. मात्र कोंबड्यांचे मांस खाऊन झाल्याचे पुढे येत आहे. पण लगेच आता तुम्ही कोंबड्यांची विल्हेवाट लावण्याची गरज नाही. कमी शिजवलेल्या चिकनमधून जीबीएसचा धोका आहे. पोल्ट्री फार्ममधून नमुने घेतल्यानंतर त्यांची तपासणी करण्यात आली. यामध्ये जीबीएसबाबत ही माहिती समोर आली असल्याची माहिती खडकवासल्याच्या नागरिकांनी मला दिली आहे, असंही अजित पवार म्हणाले.

जीबीएस आजारामुळे राज्यात दिवसभरात ३ रुग्णांचा मृत्यू झाला आहे. सांगलीतील मिरज शासकीय रुग्णालयात दोघांचा मृत्यू झाला आहे. यामध्ये एका सहा वर्षाचा मुलाचा आणि ६० वर्षाच्या महिलेचा समावेश आहे. नागपूरच्या शासकीय रुग्णालयात ४५ वर्षीय रुग्णाचा मृत्यू झालाय. तसेच दोघांवर सध्या आयसीयूत उपचार सुरु असल्याची माहिती आहे.

---------------

२०८ जीबीएस बाधित रुग्ण

आतापर्यंत पुणे शहर आणि जिल्ह्यांत २०८ जीबीएस बाधित रुग्णांपैकी ४२ रुग्ण पुणे महापालिका कार्यक्षेत्रातील असून सर्वाधिक रुग्णसंख्या ९४ ही समाविष्ट गावांतील आहे. ३० रुग्ण पिंपरी- चिंचवड महापालिका, ३२ रुग्ण पुणे ग्रामीण, १० रुग्ण इतर जिल्ह्यांतील आहेत.

# शेतकऱ्याचा चाकूने वार करून खून; विहिरीच्या पाण्यावरून वाद

जेजुरी । प्रतिनिधी

पुरंदर तालुक्यातील जेजुरी पोलिस ठाणे हद्दीतील आंबळेजवळील जगतापवस्तीवर शेतातील विहिरीच्या पाण्याच्या पाळीवरून वाद होऊन एका शेतकर्याचा चाकूने वार करून खून करण्यात आला. ही घटना शनिवारी (दि. १५) सकाळी पावणेनऊच्या सुमारास घडल्याचे जेजुरीचे सहायक पोलिस निरीक्षक दीपक वाकचौरे यांनी सांगितले.




या घटनेत अविनाश मल्हारी जगताप (वय ४०) यांचा खून झाला. याप्रकरणी संशयित बाळूदास काळूराम जगताप (वय ५५, रा. आंबळे, ता. पुरंदर) यास जेजुरी पोलिसांनी अटक केली आहे.जेजुरी पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, आंबळे हद्दीतील जगतापवस्ती येथे अविनाश मल्हारी जगताप यांची गट क्रमांक ८४८ मध्ये शेतजमीन आहे.

शनिवारी सकाळी पावणेनऊच्या सुमारास या शेतीतील विहिरीमधील पाण्याच्या पाळीवरून वाद होऊन आरोपी बाळूदास याने चाकू काढून अविनाश यांच्यावर चार ते पाच वार केले. या हल्ल्यात अविनाश यांचा मृत्यू झाला.

या वेळी या ठिकाणी उपस्थित असणारे अविनाश जगताप यांचे वडील मल्हारी जगताप, गणेश जगताप यांच्यावर देखील संशयिताने चाकूने वार करून त्यांना जखमी केले, अशी फिर्याद सौरभ दत्तात्रय जगताप यांनी जेजुरी पोलिस ठाण्यात दिली आहे.

या घटनेची माहिती मिळताच तातडीने जेजुरीचे सहायक पोलिस निरीक्षक दीपक वाकचौरे, पोलिस उपनिरीक्षक सर्जेराव पुजारी, महेश पाटील, पोलिस हवालदार दशरथ बनसोडे, विठ्ठल कदम यांनी घटनास्थळी जाऊन पळून जाण्याच्या तयारीत असणार्या बाळूदास जगताप याच्याविरोधात खुनाचा गुन्हा दाखल करून त्याला अटक केली.

# मोदी सरकारने भारताची प्रतिमा खराब केली; पुण्यात युवक काँग्रेसचे बेरोजगारी विरोधात हल्लाबोल आंदोलन

पुणे - महाराष्ट्रात वाढती बेरोजगारी आणि त्यामुळे वाढणारे गुन्हे यावर केंद्र सरकार आणि महाराष्ट्र सरकारचे लक्ष केंद्रीत करण्यासाठी युवक काँग्रेसच्या वतीने हल्लाबोल आंदोलन करण्यात आले. यावेळी हजारोच्या संख्येने युवक सहभागी झाले होते. यावेळी मोदी सरकारच्या विरोधात काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी केली.



यावेळी भारतीय युवक काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष उदय भानु चिब यांनी आक्रमक भूमिका घेतली. ते म्हणाले , आज आपण इथे उपस्थित राहून हे दर्शवले आहे कि भारत मातेच्या भविष्यासाठी हे आंदोलन किती महत्त्वचे आहे. या १० वर्षात बेरोजगारी, नशा खोरी, ड्रग्ज रॅकेट याचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. या व्यसनामुळे केवळ तो व्यसन करणारा युवक बरबाद होतं नाही तर त्याचे संपूर्ण कुटुंब बरबाद होते. आज या मोदी सरकारने भारताची प्रतिमा खराब केली आहे. हे सरकार झोपेचे सोंग घेऊन बसले आहे, असा आरोप ही यावेळी त्यांनी केला. तसेच बेरोजगारी आणि नशेखोरी थांबवण्यासाठी मोदी सरकारने प्रयत्न करावे अशी मागणी ही केली.

नोकरी द्या नशा नको अशा घोषणा देत काँग्रेस भवन येथून पदयात्रा करीत हल्लाबोल आंदोलन सुरु करण्यात आले. पुढे बालगंधर्व चौकात आंदोलन कर्त्यांना अडविण्यात आले. तर पोलिसांकडून काही आंदोलन करणार्या युवकांना पोलिसांनी ताब्यात घेतले. शिवराज मोरे म्हणाले , आपला महाराष्ट्र पुरोगामी विचारांचा महाराष्ट्र आहे. महाराष्ट्राला मिळणारे उद्योग, रोजगार आज गुजरातला पळवण्याचे काम मोदी, शहा करत आहेत. तर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री डोळे झाकून बसले आहेत. बेरोजगारीमुळे आज महाराष्ट्र काय संपूर्ण देशातले तरुण देशोधडीला लागले आहेत. वाढत्या बेरोजगारीमुळे अनेक तरुणांनी परदेशात पळ काढला आहे. आज महाराष्ट्र उडता पंजाब झाला आहे. एवढेच काय तर आज बीडचा बिहार झाला आहे. आज महाराष्ट्राची प्रतिमा घसरत चाली आहे. या वाढत्या बेरोजगारीमुळे युवकांचे आत्महत्या करण्याचे प्रमाण वाढले आहे. ही आजची लढाई निवडणुकी पुरता नाही तर युवकांना जोपर्यंत रोजगार मिळत नाही तोपर्यत ही लढाई चालू राहणार आहे. ड्रग्सचे रॅकेट महाराष्ट्रात थांबवल्या शिवाय आम्ही ही लढाई थांबवणार नाही.

एहसान खान म्हणाले , आज या आंदोलनात तरुणांचा जोश दिसत आहे. यावरून आपल्याला कळते कि आज देशात बेरोजगारीचे प्रमाण किती वाढले आहे. आज केंद्र सरकार, महाराष्ट्र सरकार या गोष्टीकडे डोळेझाक करत आहे. अशा या सरकारचे आपल्याला या आंदोलनातून डोळे उघडणी करायची आहे. तर सौरभ अमराळे म्हणाले, आधी पुण्याची ओळख ही विद्येचे माहेर घर म्हणून होती मात्र आता ड्रॅगचे माहेर घर म्हणून ओळखली जात आहे. आज पुण्यात सर्वात जास्त व्यसनाच्या आधीन गेलेले तरुण पाहायला मिळत आहे.

# पत्नीशी अनैतिक संबंधाच्या संशयातून खून; आसखेड येथील घटना

चाकण: खेड तालुक्यातील आसखेड येथे एका ४४ वर्षीय व्यक्तीचा खून करण्यात आला. पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह ओढ्यात नेऊन डोक्यात मोठा दगड घालण्यात आला. पोलिसांनी तांत्रिक तपासाच्या आधारे दोघांना अटक केली आहे. पत्नीशी अनैतिक संबंध असल्याचा संशयातून खून करण्यात आल्याची धक्कादायक माहिती यामध्ये समोर आली आहे.

अर्जुन कावडे (वय ४४) असे खून झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. या प्रकरणी पोलिसांनी गणेश काळुंखे (वय ४०, रा. मुंबई) आणि त्याचा मावस भाऊ विकास मोदळे (वय ३०, रा. मालवणी, मुंबई) अशा दोघांना अटक केली.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुरुवारी (दि. १३) आसखेड खुर्द (ता. खेड ) गावच्या हद्दीतील चाकण-वांद्रा रस्त्यापासून कालव्यानजीकच्या ओढ्यामध्ये अर्जुन कावडे याचा मृतदेह मिळून आला होता. कावडे यास मारहाण करून त्यास ओढ्यामध्ये नेऊन पुरावा नष्ट करण्याचे उद्देशाने त्याचे चेहऱ्यावर मोठा दगड घालून त्यांचा खून करण्यात आला होता. महाळुंगे एमआयडीसी पोलिसांत या प्रकरणी खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या गुन्ह्याचा समांतर तपास गुन्हे शाखा युनिट ३ यांच्याकडून सुरू होता. गुन्हे शाखेचे एक तपास पथक मुंबई येथे तपासासाठी पाठवून व दुसऱ्या तपास पथकाने खून झालेल्या अर्जुन याच्या गावामध्ये चौकशी करून तपास केला.गणेश काळुंखे याच्याकडे कसून चौकशी केली त्याने खुनाची कबुली दिली. खून झालेल्या अर्जुन कावडे याचे संशयित आरोपी गणेश काळुंखे याच्या पत्नीसोबत अनैतिक संबंध होते. त्याच संबंधातून खून केल्याची कबुली आरोपीने दिल्याची माहिती गुन्हे शाखा युनिट ३ यांच्याकडून देण्यात आली आहे. संशयित गणेश काळुंखे यास मदत करणारा त्याचा मावस विकास मोदळे यास गुन्हे शाखा युनिट ३ व महाळुंगे एमआयडीसी पोलिसांच्या पथकाने मुंबई येथून ताब्यात घेतले आहे.

# वाघोलीत बैलगाडा शर्यती, कुस्त्यांचा जंगी आखाडा उत्साहात

वाघोली : वाघोली (ता. हवेली) येथील भैरवनाथाची यात्रा मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. पारंपारिक पद्धतीने अभिषेक करून श्रद्धेने भैरवनाथाची पूजा करण्यात आली. वाघोलीत बारा वर्षानंतर प्रथमच बैलगाडा शर्यतीचे आयोजन करण्यात आले होते. जवळपास चार दिवस बैलगाडा शर्यती मोठ्या उत्साहात संपन्न झाल्या.

बैलगाडा शर्यतीसाठी थार गाडी, ट्रॅक्टर, बुलेट, फ्रिज, टीव्ही, बारा दुचाकी तसेच वैयक्तिक स्वरूपात लाखो रुपयांची मान्यवरांनी बक्षीसे ठेवली होती. पारंपरिक देवाच्या पालखी सोहळ्यात ढोल लेझीम पथकाला देखील ग्रामस्थांच्या वतीने लाखो रुपयांची बक्षिसे देण्यात आली.

वाघोली ग्रामस्थांनी आलेल्या परंपरा यांची जपणूक केल्यामुळे भैरवनाथ देवस्थान ट्रस्ट व ग्रामस्थ यांच्या योगदानाबद्दल नागरिकांनी



यात्रेचा विलक्षण अनुभव घेतला. राज्यातील नामांकित मल्लांच्या निकाली कुस्त्यांचा जंगी आखाडा भरवण्यात आला होता. आखाड्यात मानाच्या गदा याशिवाय रोख रकमेंचा देखील मल्लांवर वर्षाव करण्यात आला. वाघोलीमध्ये महिलांच्या कुस्त्यांना देखील व्यासपीठ उपलब्ध करून त्यांचा देखील गुणगौरव ट्रॉफी व रोख रक्कम बक्षीसांद्वारे करण्यात आला.

तसेच पारंपारिक पद्धतीने कलाभूषण रघुवीर खेडकर यांच्या लोकनाट्याचा सांस्कृतिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. वाघोलीत भैरवनाथ देवस्थान ट्रस्ट, दानशूर मंडळी, ग्रामस्थ यांच्या पुढाकाराने पारंपारिक पद्धतीने श्री भैरवनाथ देवाचा उत्सव सहा दिवस संपन्न होऊन तालुक्यात चर्चेचा विषय बनला आहे.

शिरूर हवेलीच्या आमदारपदी ज्ञानेश्वर कटके यांची निवड झाल्याबद्दल ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला. वाघोलीचा सुपुत्र पहिला आमदार झाल्याबद्दल ग्रामस्थांकडून सत्कार करण्यात आला. महाराष्ट्र राज्य मुलींच्या कबड्डी स्पर्धेच्या कर्णधारपदी वैभवी जाधव हिच्या निवडीबद्दल ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला. महाराष्ट्र श्री हा किताब पटकावल्याबद्दल शुभम पवार यांचा देखील ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला.